नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक ४४ * * अमरावती * गुरुवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## कुणीतरी या गरीब मुंडेंना घर द्या, हो घर...

काही महिन्यापूर्वी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात धनंजय मुंडे मंत्री होते. अगदी तळागाळातून वर आलेल्या या बिचाऱ्या गरीब माणसाला फारसे मोठे कारण नसताना मंत्री पदाहून काढले गेले आणि त्यानंतर आता मुंबई शहरात त्यांच्यासाठी घर नाही. त्यामुळेच मंत्री असतानाचे त्यांचे घर म्हणजे ते जे अत्यंत छोटे घर वापरीत आहेत. त्याच्या विरोधात ही काही विघ्न संतोषी विरोधक बोंबा मारीत आहेत. बरे त्या लहानशा घराचे नाव सातपुडा आहे. वास्तविक पाहता एवढ्याशा इटुकल्या घराला सातपुडा सारख्या विशाल पर्वताचे नाव देणे हा सातपुडा पर्वतगिरीचा अपमान नाही का. केवळ दहा-पंधरा हजार फुटांच्या घरात बिचाऱ्या धनंजय रावांना आहे तिथेच राहू दिले तर सरकारचे काय बिघडणार आहे? धनंजय रावांची माजी बायको करूणा ताई मुंडे विनाकारण धनंजय भाऊंच्याच नावाने खोट्या वावड्या पसरवीत आहे असे दिसते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धनंजय मुंडे यांचे मुंबईत किमान तीन ते चार फ्लॅट आहेत. ते नाहीत असे आम्ही कुठे म्हणतो, पण धनंजय मुंडे यांचा परिवार किती मोठा आहे याचा विचार तुम्ही करणार आहे की नाही. सध्या वेगवेगळ्या ठिकाणी सरकारी पाहुणचार घेत असलेली अनेक हरिभक्त परायण मंडळी त्यामध्ये आहेत. खरंतर धनंजय मुंडे यांच्या विरोधकांना विरोधाभास कळलाच नाही असे आम्हाला म्हणावेसे वाटते. कारण धनंजय मुंडे यांच्यासारख्या धार्मिक भावना जोपासणाऱ्या माणसाला असा त्रास देणे आम्हाला मुळीच मंजूर नाही. खरंतर त्यांच्याबद्दल सर्वांनाच करूणा अगदी सद्गदित पद्धतीने दाटून आली पाहिजे. कधीतरी चांगल्या माणसांच्या भावनांचा विचार कोणी करणार की नाही, हेही या निमित्ताने विचारावसे वाटते. घर खाली करण्यासाठी जे जे विरोधक आरोळी देत आहेत त्यांना घरघर लागो आणि ते नरकात जावोत. असे धनंजय समर्थकांचे म्हणणे आहे, कारण धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे थोर सुपुत्र आहेत. काही काळापूर्वी ते आपल्या महाराष्ट्राचे मंत्री होते. आपण थोर नेते आहोतच हा त्यांचा दावा आहे तो अमान्य करण्याचा अनेक फटकेबाज नेते कावा करीत आहेत, असे आम्हाला वाटते. बीड जिल्ह्याच्या या सुपुत्राला मुंबईची मुंबादेवी पावली पाहिजे, अशी आमची शुभेच्छा आहे. जोपर्यंत मुंडे यांना घर मिळत नाही तोपर्यंत त्यांच्या माजी पत्नीने म्हणजेच करूणा ताई यांनी या कठीण काळात त्यांना आधार द्यावा. नवरा- बायकोमध्ये भांडणे तर वरचेवर होत असतातच, पण शेवटी आपला पती साधा भोळा सदाशिवासारखा पत्नीव्रता आहे. याचा विचार करून या करुणाकराला स्मरावे, त्यांच्या पायावर प्राजक्ताची पांढरीशुभ्र आणि टपोरी फुले वहावी आणि अशा गरीब माणसाच्या पाठीशी उभे राहावे. अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. तसेच ज्या गरीब आणि मुंबईमध्ये घर नसलेल्या लोकांना अकारण नाडले जाते, म्हणजे त्रास दिला जातो. अशा लोकांच्या सोबत आमची सदिच्छा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## कंटेनर-पिकअपची धडक

# ११ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, दौसा, दि. १३ :

राजस्थानमधील दौसा येथे पिकअप आणि कंटेनरच्या धडकेत ११ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ७ मुले आणि ४ महिलांचा समावेश आहे. हे सर्वजण उत्तर प्रदेशातील कासगंज (एटा) येथील रहिवासी आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे ३.३० वाजता सैंथल पोलीस स्टेशन परिसरातील बापी गावात हा अपघात झाला. पिकअपमधील सर्व लोक खाटूश्याम यांना भेटून परतत होते.

सुरुवातीच्या तपासात कंटेनरने मागून पिकअपला धडक दिल्याचे समोर आले आहे. पिकअपमध्ये २२ हून अधिक भाविक होते. त्यापैकी १० जणांचा दौसा येथे मृत्यू झाला. दरम्यान, जयपूरच्या एसएमएस रुग्णालयात गंभीर जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

मृतांमध्ये पूर्वी (३), प्रियांका (२५), दक्षा (१२), शीला (३५), सीमा (२५), अंशु (२६) आणि सौरभ (३५) यांचा समावेश आहे. मृतापैकी चार जणांची ओळख पटलेली नाही.

काही जखमींना दौसा येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले तर गंभीर जखमींना जयपूर येथील सवाई मान सिंग (एसएमएस) रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यातील अनेक गंभीर आहेत.

## समाजाच्या आरोग्याचे रक्षण व्हायलाच हवे : सीएम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :



मुंबईतील कबुतरखान्याच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, पहिल्यांदा लोकांचे आरोग्य हे सर्वात महत्त्वाचे आहे आणि आरोग्याचे रक्षण झालेच पाहिजे. त्याचसोबत काही आस्थेचे विषय आहेत त्याची पण आपण काळजी घेऊ शकतो. त्यातून आपण मार्ग काढू शकतो. समाजाचे आरोग्य आणि समाजाची आस्था या दोन्ही गोष्टीचा विचार करून आम्ही योग्य तो निर्णय घेऊ. तसेच हा वादाचा मुद्दा नसून हा समाजाचा प्रश्न असल्याचे फडणवीस म्हणाले.

पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, जिथे मनुष्य नसतील, वस्ती नसेल अशा जागांवर कबुतरखाने बनवण्याचा विचार करण्यात येईल. आरोग्याला दुर्लक्षित करता येत नाही. मुळात हा वादाचा मुद्दा नाहीच. परंतु, काही लोक यात आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राजकारण करत आहेत. एका समाजाच्या विरोधात दुसऱ्या समाजात तेढ निर्माण करणे, भाषेवरून वाद निर्माण करणे असे चालू आहे, पण ते यशस्वी होणार नाही.

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी अनेक जिल्ह्यात मांसाहारावर बंदीचा निर्णय महापालिकांनी घेतला आहे. या निर्णयाला अनेकांनी विरोध केला आहे. यावर फडणवीस म्हणाले, असा कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही. १९८८ सालापासून हा निर्णय या ठिकाणी महाराष्ट्रात लागू आहे. अनेक महानगरपालिकांना मी विचारले की असा निर्णय का घेतला, त्यावेळी त्यांनी ८८ चा जीआर दाखवला. अगदी म्हणजे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना देखील असा निर्णय घेण्यात आला आहे.

सरकारला कोणी काय खावे हे ठरवण्यात काही इंटरेस्ट नाही. आमच्यासमोर खूप प्रश्न आहेत. त्यामुळे विनाकारण १९८८ साली घेतलेला निर्णय आणि त्यावर आज असे वादंग निर्माण करायचे की आमच्या सरकारने निर्णय घेतला.

काही लोक इथपर्यंत पोहोचले की शाकाहारी खाणाऱ्यांना ते नपुंसक म्हणायला लागले. हा मूर्खपणा बंद केला पाहिजे. ज्याला जे खायचे तो ते खात आहे. संविधानाने प्रत्येकाला जे काही करायचे ते करण्याचा अधिकार असल्याचेही ते म्हणाले.

## माझ्या जीवाला धोका

### राहुल गांधीनी व्यक्त केली भीती

■ वृत्तसंस्था
पुणे, दि. १३ :



काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी बुधवारी पुणे न्यायालयात सांगितले की त्यांच्या जीवाला धोका आहे. सावरकर बदनामी प्रकरणात त्यांनी हा धोका व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले आहे की तक्रारदार नथुराम गोडसे यांचे वंशज आहेत.

राहुल गांधी यांनी खासदार/आमदार विशेष न्यायालयाला त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि खटल्याच्या निष्पक्ष सुनावणीसाठी प्रतिबंधात्मक संरक्षण देण्याची विनंती केली. ही राज्याची संवैधानिक जबाबदारी आहे.

ते म्हणाले, महात्मा गांधींची हत्या ही एक सुनियोजित कट होती आणि त्यांच्या कुटुंबाचा इतिहास पाहता, त्यांना इजा पोहोचवण्याचा किंवा खोट्या गुंतवण्याचा धोका आहे.

त्यांनी ११ ऑगस्ट रोजी संसदेत मत चोर कुर्सी सोड ही घोषणा आणि निवडणूक गैरव्यवहारांची कागदपत्रे सादर करणे यासारख्या त्यांच्या अलिकडच्या राजकीय विधानांचाही उल्लेख केला, ज्यामुळे राजकीय विरोधक संतप्त झाले आहेत.

राहुल गांधी यांनी असेही म्हटले होते की खरा हिंदू कधीही हिंसक नसतो, द्वेष पसरवत नाही. भाजप द्वेष आणि हिंसाचार पसरवतो. या विधानानंतर भाजप नेत्यांनी त्यांच्यावर हिंदू समुदायाचा अपमान केल्याचा आरोप केला.

## काश्मीरच्या उरी येथे एक जवान शहीद

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. १३ :

बुधवारी सकाळी उत्तर काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न सुरक्षा दलांनी उधळून लावला. या कारवाईदरम्यान एक जवान शहीद झाला. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसरात शोध मोहीम सुरू केली आहे. गेल्या १३ दिवसांत दहशतवाद्यांशी लष्कराची ही तिसरी चकमक आहे.

यापूर्वी १० ऑगस्ट रोजी किश्तवाडच्या दुल भागात दहशतवाद्यांचा समावेश असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली होती. यादरम्यान दहशतवाद्यांनी सैन्यावर गोळीबार केला होता. येथेही शोध मोहीम सुरू आहे.

दहशतवाद्यांच्या शोधात १ ऑगस्टपासून कुलगामच्या अखल जंगलात शोध मोहीम सुरू आहे. येथे २ सैनिक शहीद झाले आहेत, तर ९ सैनिक जखमी झाले आहेत.

### एससी/एसटी आरक्षणात 'क्रीमी लेयर' लागू होणार?

## सर्वोच्च न्यायालयाने याचिका स्वीकारली

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी एससी/एसटी आरक्षणात 'क्रीमी लेयर' लागू करण्याच्या मागणीवर सुनावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. ही याचिका रमाशंकर प्रजापती यांनी दाखल केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की आरक्षणाचा फायदा बहुतेक एससी/एसटीच्या श्रीमंत आणि बळकट वगार्ला मिळत आहे, तर गरीब लोक मागे राहतात.

याचिकेत म्हटले आहे की, एससी/एसटी आरक्षणात दोन स्तर असावेत, प्रथम आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना, नंतर इतरांना संधी मिळावी. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला नोटीस बजावली असून पुढील सुनावणी १० ऑक्टोबर रोजी होणार आहे.

याचिकाकर्त्याने २०२४ च्या देविंदर सिंग खटल्याचा उल्लेख केला, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की अनुसूचित जाती/जमातींमध्येही 'क्रिमी लेयर' म्हणजेच श्रीमंत वर्ग ओळखला जाऊ शकतो आणि आरक्षणातून वगळला जाऊ शकतो.

## उपराष्ट्रपतिपदासाठी विरोधकही सक्रिय

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारावर चर्चा करण्यासाठी विरोधी आघाडी इंडियाचे नेते १८ ऑगस्ट रोजी भेटू शकतात. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे इंडिया ब्लॉकच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करत आहेत.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे आणि त्याच दिवशी मतमोजणीही होईल. उपराष्ट्रपतिपदासाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट आहे. २५ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.


जगदीप धनखड यांनी २१ जुलैच्या रात्री अचानक देशाच्या १४ व्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. ७४ वर्षीय धनखड यांचा कार्यकाळ १० ऑगस्ट २०२७ पर्यंत होता.

दरम्यान, भाजप या पदासाठी आपल्या विचारसरणीला समर्पित कार्यकत्यार्ला उमेदवारी देऊ शकते. पक्षात सध्या ज्या नावांचा विचार केला जात आहे त्यात कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत हे सर्वात प्रबळ दावेदार मानले जातात. दुसरे नाव सिक्कीमचे राज्यपाल ओम माथूर यांचे आहे.

लोकसभेतील एकूण ५४२ सदस्यांपैकी एनडीएचे २९३ आणि इंडिया अलायन्सचे २३४ सदस्य आहेत.

राज्यसभेतील २४० सदस्यांच्या प्रभावी संख्येपैकी, एनडीएला सुमारे १३० खासदारांचा पाठिंबा आहे आणि इंडिया अलायन्सला ७९ खासदारांचा पाठिंबा आहे. एकूणच, एनडीएला ४२३ खासदारांचा पाठिंबा आहे आणि इंडिया ब्लॉकला ३१३ खासदारांचा पाठिंबा आहे.



# निवडणूक आयोगाला राहुल गांधी घाबरतात!



■ **मुंबई :** केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी राहुल गांधींवर पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल करत, त्यांच्यावर निवडणूक आयोगासमोर जाण्याचं टाळल्याचा आरोप केला आहे.

राहुल गांधी निवडणूक आयोगाला घाबरतात, म्हणूनच ते प्रत्येक निवडणुकीत पराभूत होत आहेत, असा थेट प्रहार आठवलेंनी केला. प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, जर आयोगाने बोलावलं तर जावं. जर काही घोटाळा नसेल तर भीती कसली? पण राहुल गांधी आयोगासमोर न जाता रॅली काढतात. याला काही अर्थ नाही. आठवलेंनी विरोधकांवरही ताशेरे ओढत, ₹काँग्रेस सरकारच्या काळातही खासदारांना ताब्यात घेतलं जात होतं. आम्हीही आंदोलन केलंय, पण आजच्या विरोधकांकडे मुद्देच संपलेत. म्हणून ते अशा निरर्थक गोष्टींवर राजकारण करत आहेत, असा घणाघात केला.

# शिवाजी महाराजांचे मावळे वरण-भात खाऊन लढले का?



■ **मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे वरण-भात तुप खाऊन लढायला गेले का? ते मांस खात होते.बाजीराव पेशवे देखील मांस खात होते, त्याशिवाय युद्धावर लढता येत नाही. आता सीमेवरच्या सैन्याला सुद्धा मांस खावेच लागते. वरण-भात तूप पोळी श्रीखंड खाऊन युद्ध लढता येत नाही, तुम्ही महाराष्ट्राला नपुंसक बनवत आहात, असे म्हणत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी स्वातंत्र्यदिनी मांसविक्री आणि कत्तलखाने बंद या निर्णयावरून सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्राला कुणाच्या दबावाखाली शाकाहारी राज्य घोषात केले आहे का? मुंबई-पुण्यासारख्या शहरामध्ये नॉन व्हेज खाणाऱ्यांना प्रवेश दिला जात नाही, घर विकले जात जात नाही यावर संघर्ष सुरूच आहे. स्वातंत्र्यदिन हा आनंद साजरा करण्याचा दिन आहे, हा धार्मिक उत्सव नाही, स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेकांनी बलिदान दिले, त्यात भाजपचा आणि मांस न खाणाऱ्याचा काही संबंध नव्हता. सरकारकडे मागणी केली कुणी की स्वातंत्र्यदिनी मांस विक्री करु नये अशी. हे काय नवीन थोतांड आहे, यांचे जनक कोण आहेत, असा सवाल त्यांनी केला.
संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे फतवे मागे घ्या. तुम्ही मराठी माणसाची संस्कृती आणि संस्कार संपवत आहात. स्वातंत्र्यदिनी काय नवीनच सुरू केले की मांसाहार करायचा नाही,तुम्ही नका ना खाऊ. तुम्ही लपून खात आहोत ना मग लोकांवर बंदी का लादत आहात? प्रत्येक प्रकारची बंदी लोकांवर लादली जात आहे. हे खाऊ नका, हे बोलू नका, हे कपडे घालू नका. हा महाराष्ट्र आहे का बंदी राष्ट्र असा संतप्त सवाल राऊतांनी केला आहे.

# धनंजय मुंडे सरकारचे जावई लागलेत का?



■ **मुंबई :** धनंजय मुंडे यांनी सातपुडा बंगला न सोडल्याने त्यांना ९ लाख ३३ हजार रुपये दंड लागत असून, आता ही रक्कम ४६ लाखांपर्यंत पोहोचली आहे, ही रक्कम ते अजून भरत नाही ते काय सरकारचे जावई लागून गेले का? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला आहे. मुंडे ना बंगला सोडत आहेत ना दंड भरत आहे तरी देखील त्यांच्यावर कारवाई होत नाही. आता मी सरकारला नोटीस देणार आहे.
अंजली दमानिया म्हणाल्या की, कायदा सर्वांना समान आहे हे सरकारने दाखवून देण्याची गरज आहे. आता मी नोटीस पाठवणार असून जर काही झाले नाही तर सरकारला मी कोर्टात खेचू. सरकार काही करणार नाही कारण मुंडे हे अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचे मित्र आहेत. धनंजय मुंडे यांचे मलबार हिलवर वीर भवन नावाच्या इमारतीमध्ये ९०२ नंबरचा फ्लॅट आहे. ते मुंबईत माझी मालमत्ता नाही हे जे म्हणत आले आहे. मुलीच्या शिक्षणासाठी आणि तब्येतीच्या कारणामुळे मला इथे रहावे लागत आहे, म्हणून ते सातपुडा बंगल्यात राहत आहेत असे सांगितले जात आहे. मुंडे किती खोटं बोलतात, त्यांच्या तब्येतीला काहीच झालेले नाही. बेल्स पालसी हा आजार केवळ ४ आठवडे चालतो, पाचव्या आठवड्याला ठणठणीत बरे होतात.

दमानिया म्हणाल्या की, हा व्यक्ती पदोपदी खोटं बोलणारा आहे. सातपुडा बंगला हा शासकीय बंगला आहे, आणि तो कुठल्याही परिस्थितीमध्ये १५ दिवसात रिकामा करणे गरजेचे होते. आता ५ महिने झाले त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पण बंगला सोडलेला नाही.

## मराठी एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांची पोलिसांकडून धरपकड

# दादर कबुतरखाना परिसरात राडा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३:** दादरमधील कबुतरखाना बंदीच्या समर्थनार्थ आज १३ ऑगस्ट रोजी मराठी एकीकरण समितीने आंदोलन पुकारण्यात आले. जैन मुनींनी दिलेल्या धमकीला प्रत्युत्तर देण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. मराठा एकीकरण समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आंदोलनस्थळी दाखल झाले असता, पोलिसांकडून त्यांची धरपकड करण्यात आली. या दरम्यान, पोलिसांनी मारहाण केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

आंदोलनापूर्वीच दादर पोलिसांनी मराठी एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस बजावली होती. मात्र तरीही दादर कबुतरखाना परिसरात सकाळी ११ वाजेनंतर आंदोलक जमायला सुरुवात झाली. जमलेल्या आंदोलकांकडून परिसरात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पोलिस आणि आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरू केली. पोलिसांनी आणीबाणीचा काळ आणू नये, असे आंदोलकांनी म्हटले आहे.

हा विषय धार्मिक नसून सामाजिक असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. शस्त्र उचलण्याची भाषा मराठी माणसाला कोणी सांगू नये, मराठी एकीकरण समितीच्या आंदोलनाला अटकाव का असा सवाल आंदोलकांकडून उपस्थित करण्यात आला. काही दिवसांपूर्वी जैन समाजाच्या आंदोलकाकडून हायकोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन झाले, पोलिसांच्या अंगावर धावून गेले, ताडपत्री-शेडची मोडतोड केली, त्यांच्यावर गुन्हा का दाखल केला नाही? असा प्रश्न आंदोलकांनी उपस्थित केला.

शस्त्रे काढण्याची भाषा करुनही जैनधर्मीयांवर कोणतीही कारवाई केली जात नाही. ६ ऑगस्टला पोलिसांनी एकाही जैन धर्मीयांवर कारवाई केली नाही. तेव्हा तुम्ही कुठे होता? असा सवाल मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी गोवर्धन देशमुख यांनी केला.

या सर्व घडामोडींवर मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मौन बाळगल्याचे दिसून आले. त्यांना आजच्या आंदोलनाबाबत विचारले असता, मला त्यावर काहीही बोलायचे नाही, असे ते म्हणालेत.

**तगडा पोलिस बंदोबस्त**

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून जैन मंदिराचा मुख्य दरवाजाही आज बंद ठेवण्यात आला आहे. शिवाय पोलिसांनी परिसरातील दुकाने दुपारी १ वाजेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले होते.

दादर, शिवाजी पार्क, शाहू नगर, धारावी, व्हि बी नगर, माहिम, आणि कुर्ला पोलिस ठाण्यातील १५० पोलिस या ठिकाणी तैनात आहेत. याशिवाय, राज्य राखीव दलाची अतिरिक्त कुमकही बोलावण्यात आली आहे. यामुळे संपूर्ण परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे. दरम्यान, कबुतरखान्याचा वाद चिघळण्याचे संकेत आहेत.

# मोकळे झालेले जयंतराव बसून करणार कार्यक्रम!



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३:** सात वर्षांच्या भारदस्त प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर जयंत पाटील आता निवांत बसतील, असा गैरसमज जो कोणी केला असेल त्यांना लवकरच जाग येणार आहे! कारण जयंतराव आता मोकळे झालेत आणि जेव्हा ते मोकळे होतात, तेव्हा बसून कार्यक्रम कसा लावायचा, हे त्यांना चांगलंच माहीत आहे.

प्रदेशाध्यक्षपदामुळे इस्लामपूर आणि सांगली जिल्ह्याकडे लक्ष देण्यास वेळ न मिळालेला जयंतराव आता पूर्णवेळ ह्यगावाकडंह्ल वळले आहेत. महायुतीच्या चढाया आणि स्वकीयांच्या गळाला लागलेल्या मोहिमेनं त्यांच्यातला ओरिजनल जयंत जागा झाला आहे. आणि जागा झाल्यावर ते फक्त बघत बसत नाहीत – बसून कार्यक्रम करतात.

गेल्या निवडणुकीत निशिकांत पाटलांनी दिलेली कडवी टक्कर, त्यात महायुतीने एकाच तालुक्यातून दिलेले जिल्हाध्यक्ष, स्वकीय नेत्यांचे अजित पवार आणि भाजपकडे पलायन – या सगळ्याचा एकत्र परिणाम म्हणजे जयंतराव आता ह्यआक्रमक मोडह्लमध्ये. जाऊन आलेल्या कार्यकत्यांवर ते उघड इशारे देत आहेत – ज्यांना जायचंय त्यांनी आत्ताच जा! निवडणुकीच्या वेळी गेला तर कार्यक्रम करीन! जयंतरावांच्या पुढील कार्यक्रमाची अनेकांना प्रतिक्षा आहे.

# आता आमदार-खासदारांच्या गाड्याही मंत्रालयाबाहेर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३:** मंत्रालयाच्या सुरक्षा आणि पार्किंग व्यवस्थेतील वाढत्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गृह विभागाने मोठा निर्णय घेतला असून, आता राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री यांसारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना वगळता इतर कोणालाही मंत्रालयाच्या आवारात गाडी पार्क करण्यास परवानगी मिळणार नाही.

या नव्या नियमामुळे खासदार आणि आमदारांनाही मोठा धक्का बसला आहे. त्यांना फक्त कार ड्रॉप पास मिळणार असून, मंत्रालयाच्या प्रवेशद्वारात प्रवाशांना सोडल्यानंतर गाडी ताबडतोब बाहेर न्हावी लागेल. तसेच, वारंवार गाड्या बदलता येऊ नयेत म्हणून प्रत्येकाला केवळ एकच स्टिकर दिला जाणार आहे.

गेल्या काही वर्षांत मंत्रालयात येणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड वाढल्याने पार्किंगसाठी जागा शिल्लक राहत नव्हती आणि सुरक्षेचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे आता बिल्डर, दलाल तसेच मंत्री आणि आमदारांसोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गाड्यांनाही प्रवेशबंदी राहणार आहे.

पासधारक व्यक्तींनाच प्रवेशाची मुभा असेल. मंत्रालयात प्रवेशासाठी डिजिटल पडताळणीची अट कायम राहील. मात्र, ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही अशांसाठी प्रवेशद्वारावर स्वतंत्र खिडकी ठेवण्यात आली आहे. येथे चेहरा पडताळणी करून त्यांना प्रवेश कार्ड दिले जाईल. या निर्णयामुळे मंत्रालयातील पार्किंग गोंधळावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असली तरी नव्या निर्णयामुळे आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# कुर्ल्यात पुस्तकांचा उत्सव!



## शिरीषकुमार बालवाचनालयचे धमाकेदार उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३:** कुर्ला (पूर्व) येथील प्रबोधन पूर्व प्राथमिक बालवाटिकेत पल्लवी सभागृहात शिरीषकुमार बालवाचनालयचे भव्य उद्घाटन उत्साहाच्या लाटेत पार पडले. उद्घाटनाची धुरा ख्यातनाम बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हाती सोपवण्यात आली होती.

सोहळ्याची सुरुवात सरस्वतीमाता व वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. तिसरी-चौथीच्या मुलांनी ईशस्तवन व स्वागतगीताने वातावरण भारावले.
मात्र खरा वाह! क्षण होता, रिमोट कंट्रोल कारमधून परीसोबत आलेली पुस्तके आणि त्यातून झालेले अनोखे उद्घाटन!

कार्यक्रम रंगतदार बनवणाऱ्या सादरीकरणात नाटुकले, हसरा नाचरा श्रावण आलावर नृत्य, नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने कोळीगीत, तसेच लाडोबा हे एकनाथ आव्हाड लिखित गीत मुलांनी गाऊन उपस्थितांना भावविभोर केले. दुसरीचा पार्थ वावरे याने सांगितलेली शिरीषकुमारांची गोष्ट मनात घर करून गेली. जादूगाराच्या चमत्कारिक खेळांनी लहानग्यांच्या डोळ्यांत थक्कतेचे तेज भरले.


बालमनांना प्रेरित करणाऱ्या भाषणात आव्हाड यांनी कविता व कथा सादर करत वाचनाच्या सवयीचे महत्त्व अधोरेखित केले. सौ. विशाखा परब यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली, तर डॉ. भाऊ कोरगावकर यांनी आभार प्रदर्शनासोबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिक्षिका मेघा येवले यांनी ओघवत्या शब्दांत रंगत आणली.

विश्वस्त सौ. शलाका कोरगावकर, मुख्याध्यापक श्री. संतोष चिकणे, पालक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत झालेले हे आयोजन प्रबोधन कुर्ला परिवारासाठी केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर वाचन संस्कृतीच्या नव्या पवाची धमाकेदार सुरुवात होती.

## कुस्तीगीर सुशील कुमारचा

# जामीन रद्द

■ **वृत्तसंस्था, सोनीपत, दि. १३:** हरियाणाचा दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमारला सर्वोच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती चॅम्पियन सागर धनखड



हत्याकांडातील त्याचा जामीन न्यायालयाने रद्द केला आहे आणि त्याला ७ दिवसांच्या आत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने मृत सागरचे वडील अशोक धनखड यांची याचिका मान्य केली आणि दिल्ली उच्च न्यायालयाचा ४ मार्चचा जामीन आदेश रद्द केला.
सुशील कुमार आणि त्याच्या साथीदारांवर सागर धनखड यांच्या हत्येत मालमत्तेच्या वादातून हल्ला केल्याचा आरोप आहे. पोस्टमॉर्टम रिपोर्टनुसार, सागरचा मृत्यू डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, सुशील कुमारला आता पोलिसांसमोर शरण जावे लागणार आहे.

न्यायालयात सागर धनखड यांच्या वडिलांच्या वतीने वरिष्ठ वकील सिद्धार्थ मृदुल यांनी युक्तिवाद केला, तर वरिष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी सुशील कुमारची बाजू मांडली. सुनावणीनंतर वकी तुली यांनी माहिती दिली आणि सांगितले की, सुशील कुमारवर २०२१ मध्ये सागर धनखड यांच्यासह इतर २२ जणांची हत्या केल्याचा आरोप आहे. अंतरिम जामिनाच्या वेळी त्याने साक्षीदारांशी छेडछाडही केली. यामुळे खटल्यादरम्यान सर्व साक्षीदार त्याला पाठिंबा देऊ शकले नाहीत. सुशील कुमार यांच्याविरुद्ध वैज्ञानिक पुरावेही उपलब्ध आहेत.

# पुणे विमानतळासाठी नवी मागणी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १३:** ब्राह्मण महासंघाच्या वतीने पेशवा का नकोत? या विषयावर व्याख्याते सुशील कुलकर्णी यांचे व्याख्यान पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला चांगला प्रतिसाद मिळाला.

या व्याख्यानात बोलताना 'बाजीराव पेशवा यांचे नाव पुणे विमानतळाला द्यावे' अशी मागणी सुशील कुलकर्णी यांनी केली तर बाजीराव पेशवा यांच्या नावाने राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार सुरु करावा, अशी भूमिका ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी मांडली.
या कार्यक्रमात सचिन बोधनी,अभय ओरपे, गिरीश गुर्जर यांच्या नेतृत्वात १०० कार्यकर्त्यांनी ब्राह्मण महासंघ मधे नुकताच प्रवेश केला होता त्यांना पदांची जबाबदारी या कार्यक्रमात देण्यात आली.मनोज तारे यांनी प्रास्ताविक केले.याप्रसंगी नितीन शुक्ल यांची पुणे जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली तसेच अनेक विविध क्षेत्रातील तज्ञ यांची ब्राह्मण महासंघाच्या पदाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली.

यावेळी बोलताना सुशील कुलकर्णी यांनी ऐतिहासिक घटनांचा सखोल आढावा घेतला. विशेषतः पेशव्यांच्या कारकीदीर्तील राजकीय, लष्करी आणि सामाजिक घडामोडींचा अभ्यास करत त्यांनी त्या काळातील परिस्थितीचे विश्लेषण मांडले.

# ९ वर्षांच्या २ मुलींवर गँगरेप

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३:** राजधानी दिल्लीतील नरेला परिसरातील लंपूर भागात बांधण्यात येत असलेल्या स्विमिंग पूलमध्ये दोन मुलींवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. दोन्ही मुली सुमारे ९ वर्षांच्या आहेत. या प्रकरणात पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. आरोपींपैकी एक स्विमिंग पूलचा कंत्राटदार आहे आणि दुसरा केअरटेकर आहे.
पोलिसांनी सांगितले की, स्विमिंग पूल चालू नाही. सध्या येथे काम सुरू आहे. त्यामुळे जवळच्या भागातील मुले येथे आंघोळीसाठी येत असत.

आऊटर नॉर्थ डीसीपी हरेश्वर स्वामी यांनी सांगितले की, मुलींवर सामूहिक बलात्काराची घटना ७ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. स्विमिंग पूलचे गेट उघडे पाहून दोन्ही मुली आत गेल्या. दोघींनाही एकटे पाहून कंत्राटदार अनिलने त्यांना एका खोलीत नेले आणि कुलूप लावले.

यानंतर त्यांनी दोघींवर एक-एक करून बलात्कार केला. यानंतर काळजीवाहू मुनीलनेही दोन्ही मुलींवर बलात्कार केला. दोन्ही आरोपींनी मुलींना जीवे मारण्याची धमकी दिली आणि गप्प राहण्यास सांगितले.
एका मुलीने हे तिच्या मावशीला सांगितले. त्यानंतर कुटुंबातील सदस्यांनी दुसऱ्या मुलीचीही चौकशी केली. अशा प्रकारे सामूहिक बलात्कार उघडकीस आला. आरोपी अनिल कुमार हा मूळचा बिहारमधील समस्तीपूरचा रहिवासी आहे तर मुनिल कुमार हा उत्तर प्रदेशातील आझमगडचा रहिवासी आहे.

## १६ कोटी रूपये किमतीचा फ्लॅट...

# तरीही सातपुडाला गळामिठी!

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १३:** धनंजय मुंडेंचं मंत्रिपद गेलं, खुर्ची गेलीय, पण सातपुडा बंगला मात्र अजूनही त्यांचाच आहे! बीडमधील संतोष देशमुख हत्येच्या आरोपी वाल्मीक कराड यांच्याशी जवळीक उघड होताच चार महिन्यांपूर्वीच मंत्रिपद गेलं. पण राजीनामा देऊन १५ दिवसांत सरकारी निवास रिकामं करण्याचा नियम मुंडेंच्या बाबतीत कागदावरच!

नव्या मंत्री छगन भुजबळांसाठी सातपुडा बंगला रिकामा व्हायचं नाव घेत नाही. मुंडेंच्या हट्टामुळे ४२ लाखांचा दंड थेट त्यांच्या माथी. तरीही ते निर्लज्जपणे म्हणतात घरच नाही! पण सत्याने सगळं उघड केलं आहे. विधानसभेच्या प्रतिज्ञापत्रात मुंडेंकडे मुंबईतील गिरगाव चौपाटीवर २१५१ चौ. फुटांचा, सी-फेसिंग, १६ कोटी ५० लाखांचा अलिशान फ्लॅट असल्याचं काळं-पांढरं! वीरभवनच्या ९ व्या मजल्यावरचा हा स्वर्गीय पत्ता त्यांच्या आणि पत्नी राजश्री यांच्या नावावर. त्यात स्वतः १० कोटी दिल्याचंही नोंदवलंय.

गंमत म्हणजे हा फ्लॅट पडून आहे रिकामा! वापरात नाही. तरीही सातपुड्याच्या दाराला मुंडेंची कुंडी घट्टच. दंड वाढतच चाललाय, भुजबळ वाट बघतायत, पण सातपुड्याची कुलूपं मात्र हलायची नाहीत!

थोडक्यात काय तर १६ कोटींच्या सी-फेसिंग फ्लॅटचा मालक घर नाही म्हणून अजूनही सरकारी बंगला व्यापून बसला आहे आणि महाराष्ट्र चक्क बघत आहे!

# मुंडेंना माझ्या फ्लॅटमध्ये राहू द्या, मी निघून जाईन



धनंजय मुंडे यांनी लाज सोडली आहे. त्यांचे मुंबईत मलबार हिल, हिरानंदानी मध्ये फ्लॅट आहे. माझा फ्लॅट हा देखील त्यांचाच आहे. त्यांना जर हिरानंदानी आणि मलबार हिलच्या फ्लॅटमध्ये रहावे वाटत नसेल तर त्यांनी माज्या फ्लॅटमध्ये येऊन राहू शकतात, असे करुणा मुंडे यांनी म्हटले आहे. तर धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात कधीच येणार नाही. ६ महिन्यांच्या आतमध्ये त्यांची आमदारकी रद्द होणार आहे. कालच त्यांना औरंगाबाद हायकोर्टाने १० हजार रुपये दंडही ठोठावला आहे.
करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांच्या दुसऱ्या पत्नीचे आणि माझे काहीच मतभेद नाहीत. धनंजय मुंडे यांनी आपण लोकप्रतिनिधी आहोत हे विसरु नये. शासकीय बंगला न सोडण्यासाठी ते खोटे बोलत आहेत. मुंडे यांनी स्वतःचे फ्लॅट रेंटने दिले असतील तर त्यांनी माज्या फ्लॅटमध्ये राहण्यासाठी यावे मी दुसरीकडे जाईल. ८ वर्षे तुम्ही जिथे राहिले तिथे दुसऱ्या पत्नीसह येऊन राहू शकतात. मी माज्या मुलांसह बाहेर जाईल. करुणा मुंडे म्हणाल्या की, ४२ लाख रुपयांचा दंड हा धनंजय मुंडे यांच्यासाठी काही मोठी गोष्ट नाही, ही छोटीशी रक्कम आहे. ते ९० लाख रुपयांची घड्याळ घालतात. ५ लाख रुपयांचे बूट वापरतात. त्यांच्या वाहन चालकाला रोज २ हजार रुपये जेवणासाठी दिले जातात. त्यांच्यासाठी ४२ लाख रुपये म्हणजे मोठी गोष्ट नाही.

**मुंडेंच्या पदाचा गैरफायदा घेतला**

करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात कधीच येणार नाही. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी त्यांना क्लीन चीट देण्यात आली असेल.पण वाल्मीक कराड असो की सांगली मध्ये त्यांचा साला असो की गंगाखेडमध्ये त्यांची बहिण असो असे लोक गरिबांच्या जमिनी हिसकावून घेतात.हे सर्व धनंजय मुंडे यांच्या राजकीय ताकदीवर सुरू होते.

# आरोग्य विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने स्थलांतर प्रमाणपत्र

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. १३:** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातून पदवी, पदविका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी पुढील शिक्षणाकरीता इतर विद्यापीठात किंवा विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतात.

याप्रसंगी विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की, आतापर्यंत विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत ऑफलाईन पध्दतीने स्थलांतर प्रमाणपत्र अदा करण्यात येत होते. यामध्ये विद्यार्थ्यांचा ब?याच वेळ तसेच विद्यापीठाचे मनुष्यबळ आणि वेळ खर्च होत होता. सदरबाब विचारात घेता विद्यापीठाद्वारे सदर कार्यप्रणालीचे ऑटोमेशन करण्यात आले. त्यानुषंगाने विद्यापीठ स्थापनेपासुन म्हणजे सन १९९८-९९ ते २०२३-२४ पर्यंत प्रवेशित



विद्यार्थ्यांना संगणकीय प्रणालीद्वारे तयार केलेले स्थलांतर प्रमाणपत्र वितरीत करण्याचे कार्य सुरु करण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले. व सदर प्रणाली आजपासुन कार्यान्वीत केली.

याप्रसंगी कुलसचिव, डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर ऑटोमेशन प्रणालीद्वारे विद्यार्थी 'ओजीन तयार करुन त्यामधून आपले स्थलांतर प्रमाणपत्र तयार करण्याकरीता योग्य सोय करुन देण्यात येईल.

प्रणाली यशस्वी करण्याकरीता पात्रता विभागाचे विभाग प्रमुख उपकुलसचिव महेन्द्र कोठावदे, सहाय्यक कुलसचिव नितीन शिंदे, सांख्यिकी अधिकारी प्रविण घाटेकर आदी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

महासागर
गुरूवार, दि. 14 ऑगस्ट 2025
अमरावती




# जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड

## 5 लाखांचा मुद्देमाल जप्त

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.13 )**- जिल्ह्यातील शेंदुरजना घाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेने (स्थागुशा) मोठी कारवाई करत 18 जणांना ताब्यात घेतले. या धाडीत एकूण 5 लाख 5 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी ग्रामीण भागातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार 12 ऑगस्ट 2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथक शेंदुरजना घाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली. प्रभात चौक, शेंदुरजना घाट येथील अक्षय अरुण वरूडकर यांच्या घरात जुगार खेळला जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तत्काळ छापा टाकला. कारवाईदरम्यान पोलीसांनी 18 आरोपींना ताब्यात घेतले.

अक्षय अरूण वरूडकर (34, प्रभात चौक, शे. घाट), अब्दुल अश्पाक अब्दुल सलाम (40, मलकापूर), राजेश देवानंद सुरजुसे (32, शे. घाट), प्रदीप रामेश्वर राठोड (25, शे. घाट), निखीलेश प्रदीप खंडेलवाल (38, पुसला), अनुप मनोहर दुपारे (26, मलकापूर), शेख इरफान शेख बब्बु (28, शे. घाट), अक्षय दिवाकर कु-हाडे (30, शे. घाट), मोहीत सुरेश गुल्हाणे (25, शे. घाट), रविंद्र वासुदेवराव क्षिरसागर (35, शे. घाट), आकिब शहा समशेर शहा (25, शे. घाट), हरीष गोविंदाव अकर्ते (47, शे. घाट), मंगेश अशोकराव चोपडे (27, शे. घाट), हर्षद अविनाश अढाउ (22, शे. घाट), शेख जुबेर शेख इस्त्राईल (38, मलकापूर), किशोर मंगलराम पेन्दाम (36, शे. घाट), नरेश वामनराव गीरी (50, शे. घाट) आणि प्रमोद प्रभाकरराव ढोरे (40, शे. घाट). असे अटक करण्यात आलेल्या जुगाऱ्यांची नावे आहेत.

या धाडीत पोलिसांनी रोख रक्कम 1,93,800 रुपये, जुगार साहित्य व ताश पत्ते (किंमत अंदाजे 200 रुपये), 18 मोबाईल फोन (किंमत अंदाजे 1,71,000 रुपये) तसेच दोन दुचाकी (किंमत अंदाजे 1,40,000 रुपये) असा एकूण 5,05,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत (भापोसे) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशा प्रमुख पोनि किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोउपनि सागर हटवार, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, रविंद्र बावणे, पंकज फाटे तसेच चालक पोकॉ कुणाल भोयर यांच्या पथकाने पार पाडली. पोलीस प्रशासनाकडून अवैध जुगार व इतर गैरकृत्यांवर पुढील काळातही अशीच कठोर कारवाई सुरू ठेवली जाणार असल्याचे सांगण्यात आले.


# श्रावणात घननिळा धो धो बरसला

## दिवसभरात जिल्ह्यात साधारण 50 मि.मी. पाऊस! | नदी, नाले दुथडी भरले

महासागर टीम


*अमरावती,( दि.13 ) - गेल्या काही दिवसांपासून रेंगाळलेल्या पावसाने आज श्रावणात अचानक जोर पकडला. सकाळपासूनच जिल्ह्यात मुसळधार आणि संततधार पावसाला सुरुवात झाली. अमरावती शहरात पहाटेपासूनच रस्ते, चौक आणि गल्लीबोळ जलमय झाले. नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले असून, कामकाजावर मोठा परिणाम झाला. हवामान खात्याच्या माहितीनुसार, एका दिवसात साधारण 50 मि.मी. पाऊस झाला असून, ही परिस्थिती पुढील आठ दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. सकाळी 7 वाजता सुरू झालेला पाऊस सायंकाळपर्यंत अविरत कोसळत राहिला. शहरासह ग्रामीण भागातील सखल भागात पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, शाळा व कॉलेज परिसरात पाणी साचल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. चिखलदरा, धारणी, वरुड, मोर्शी आदी तालुक्यांमध्येही जोरदार सरी कोसळत आहेत. शेतीसाठी हा पाऊस काही ठिकाणी फायदेशीर असला, तरी पाणी साचल्यास पिकांचे नुकसान होण्याची शक्यता शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे.*

## परिसरातील पाच गावांचा संपर्क तुटला



अंजनगाव बारी - गेल्या 12 दिवसांच्या उष्णतेनंतर जिल्ह्यात व परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून पिकांना जीवनदान मिळाले आहे. संततधार पावसामुळे तलाव, नाले व ओढे दुथडी भरून वाहू लागले आहेत. करपणाऱ्या उभ्या पिकांना नवसंजीवनी मिळाल्याने बळीराजा सुखावला आहे. अंजनगाव बारीलगत पार्डी देवी येथील रेल्वे भुयारी अंडरपास जलमय झाला असून, पाण्याचा विसर्ग वाढल्याने परिसरातील पाच गावांचा संपर्क तुटला आहे. यात उदखेड, अऱ्हाड-कुऱ्हाड, वडगाव जिरे (रायघोळ नदीला पूर), तसेच चांदूर रेल्वे, मालखेड रेल्वे आदी गावांचा समावेश आहे. संपर्क तुटल्याने नागरिकांना प्रवासात अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना या भुयारी मार्गाने जिव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याने उड्डाण पूल उभारण्याची मागणी पुन्हा जोर धरत आहे. रेल्वे प्रशासनाने मागणी फेटाळल्याने कायमस्वरूपी तोडगा कधी निघेल, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील 24 तासांत जिल्ह्यात काही ठिकाणी गडगडाटी वादळे, विजांचा कडकडाट व सोसाट्याच्या वाऱ्यासह 40-50 किमी प्रतितास वेगाने जोरदार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तहसीलदार विजय लोखंडे यांनी परिस्थितीची पाहणी केली.

## बागाजी सागरचे 25 दरवाजे उघडले



धामणगाव रेल्वे- तालुक्यात सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. वरुड बागजी येथील लोअर वर्धा धरणाचे 25 दरवाजे उघडण्यात आले असून प्रति सेकंद 668.73 घनमीटर वेगाने पाणी वर्धा नदीत सोडले जात आहे. सोनेगाव खर्डा रस्ता पूर्णपणे बंद झाला असून, दत्तापूर परिसरात पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे. तहसीलदारांनी पाहणी केली आहे.

## पुर्णा मध्यम प्रकल्प भरला

चांदूर बाजार तालुक्यातील पुर्णा मध्यम प्रकल्पाची जलपातळी 448.91 मीटर झाली असून, 64.40त्न पाणीसाठा झाला आहे. पाणलोट क्षेत्रात पावसामुळे पाण्याची आवक वाढण्याची शक्यता आहे. आवश्यकतेनुसार विसर्ग केला जाईल, म्हणून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



## चांदूर रेल्वे तालुक्यात रौद्ररूप



**चांदूर रेल्वे**- शहर व तालुक्यात पावसाने आज रौद्ररूप धारण केले. काही वस्त्यांमध्ये घरे जलमय झाली. पत्रिकार कॉलनीतील मुकिंदा सावंत व टावरी यांच्या घरात पाणी घुसून नुकसान झाले. प्रशासनाने तात्काळ पंचनामा केला. नांदगाव-खंडेश्वर मार्गावरील रेल्वे पुलाजवळील नाल्याचा प्रवाह वाढल्याने वाहतूक बंद झाली. मांजरखेड जाणारा मार्गही पाण्याखाली गेला. महारुद्रनगर, खडकपुरा, शेंद्रीपुरा व डांगरीपुरा येथे पाणी साचून नागरिकांच्या समस्या वाढल्या आहेत.



## तिवसा तालुक्यात दमदार हजेरी



तिवसामध्ये सकाळी रिमझिम सुरुवात होऊन 11.30 वाजता पावसाने जोर धरला. दमदार सरींमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळेल, तसेच पाण्याची कमतरता भासणाऱ्या गावांना दिलासा मिळेल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

## तळेगावात नदीकाठच्या भागांना फटका



तळेगाव दशासरमध्ये सततच्या पावसामुळे नदीकाठच्या प्रभाग क्रमांक 2 मध्ये पाणी शिरले. ताटेश्वर मंदिरापासून पुढे पाणी साचून तलावासारखे दृश्य दिसत आहे. सायंकाळपर्यंत पाऊस सुरूच राहिल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.





## माडू नदीच्या पात्रात 63 वर्षीय इसमाचा मृतदेह

**मोर्शी** - मोर्शीजवळील श्रीक्षेत्र सालबर्डी येथे माडू नदीच्या पात्रात 63 वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. ही घटना 13 ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे 11 वाजता उघडकीस आली. सदर प्रकरण मध्यप्रदेशातील आठनेर पोलीस स्टेशन हद्दीत घडले असून, मृत्यूचे कारण शोधण्याचे काम मध्यप्रदेश पोलिसांकडून सुरू आहे. मृताची ओळख सुभाष किसनराव चर्जन (वय 63, रा. ग्रामीण रुग्णालयाजवळ, चांदूरबाजार) अशी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष चर्जन हे 12 ऑगस्ट रोजी एमएच एपी 39 46 क्रमांकाच्या प्लेझर मोपेडने श्रीक्षेत्र सालबर्डी येथे देवदर्शनासाठी आले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचा मृतदेह नदीच्या पात्रातील खडकावर आढळून आला. मोर्शी पोलिसांनी नातेवाईकांकडून माहिती घेतल्यानंतर प्रकरणाची नोंद आठनेर पोलिसांकडे केली. त्यानंतर पंचनामा व आवश्यक सोपस्कार पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

## होली मदर इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन

**अमरावती** - स्थानिक राजहिलनगर व भटवाडी येथील होली मदर इंग्लिश प्री-प्रायमरी स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मुलींनी मुलांना राखी बांधली. तर मुलांनी मुलींना भेटवस्तू दिली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी झाडाला राखी बांधून वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. त्याचबरोबर नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन प्रियंका अढाऊ तर आभार प्रदर्शन देशमुख यांनी केले.

## प्लास्टिक जप्ती, दंड मोहीम

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 13 )**- अमरावती महानगरपालिकेच्या वतीने गांधी चौक, प्रभात चौक, जयस्तंभ चौक परिसरात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम राबविण्यात आली. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त (प्रशासन) डॉ. मेघना वासनकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर (झोन क्र. 2, राजापेठ) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली.

या तपासणीत 36 आस्थापना, हातगाडीवाले, भाजीपाला व फळ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. यापैकी 6 आस्थापनांमध्ये डस्टबिन नसल्याचे आढळले. संबंधित मालकांकडून प्रत्येकी 500 प्रमाणे एकूण 3,000 दंड वसूल करण्यात आला. कारवाईदरम्यान झोन क्र. 2 चे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक विजय बुरे तसेच स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. मनपा प्रशासनाने सांगितले की, अशा मोहिमा पुढील काळातही सातत्याने राबविण्यात येतील, ज्यामुळे स्वच्छता आणि पर्यावरण पूरक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढेल.

# एरंडगाव येथे जुगारावर धाड, 11 आरोपी ताब्यात

## 1 लाख 10 हजारांचा मुद्देमाल जप्त



महासागर प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.13 )** - चांदूर रेल्वे पोलीसांनी 11 ऑगस्ट रोजी एरंडगाव येथे जुगारावर धाड टाकून 11 आरोपींना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान 1 लाख 10 हजार 100 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुप्त बातमीदाराच्या माहितीनुसार, सार्वजनिक ठिकाणी 'एक्का बादशाह' नावाचा हार-जीतचा जुगार खेळ सुरू असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी धाड टाकली. आरोपींमध्ये मनोहर माकडे, हनुमंत घोडे, अक्षय ढेकले, योगेश झिमटे, पवन झिमटे, प्रशांत वानखडे, आकाश झिमटे, सागर डाफे, अभिषेक कोडमकर, अविनाश सावरकर आणि कुणाल सोनोने (सर्व रा. एरंडगाव) यांचा समावेश आहे. अंगझडतीतून 5,100 रुपये रोख आणि 8 अँड्रॉइड मोबाइल (किंमत अंदाजे 1,05,000 रुपये) असा एकूण 1,10,100 रुपयांचा मुद्देमाल मिळाला. सर्व आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. ही कारवाई ठाणेदार अजय आकरे, पीएसआय नंदलाल लिंगोट, कर्मचारी शिवाजी घुगे, नितीन शेंडे, योगेश नेवारे, सागर पाचपोर, संदीप वासनिक, योगेश कडूकार आणि रामेश्वर यांनी केली.

## अंधारातून उजेडाकडे

# बेवारस अंध मुलीपासून 'महसूल सहायक' पर्यंतचा माला चा प्रवास

### नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात होणार रुजू | पालकमंत्र्यांकडून शंकरबाबा व मालाचे कौतुक

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.13 )** - जिल्ह्यातील वझ्झर येथील पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या सानिध्यात वाढलेल्या माला हिची महसूल सहायक म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्ती झाली आहे. हा अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माला आणि शंकरबाबांचे अभिनंदन केले.

मालाची जीवनकथा ही प्रेरणादायी आहे. जळगाव रेल्वे स्थानकावर बेवारस अवस्थेत आढळलेल्या, डोळ्यांचा प्रकाश नसलेल्या एका बालिकेला पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी आपल्या दिव्यांग बालगृहात आणले.

तिला 'माला' हे नाव देत शिक्षण आणि पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या आधाराने आणि स्वत:च्या जिद्दीच्या बळावर मालाने ब्रेल लिपीतून दहावी, बारावी, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.



### भारतातील ऐतिहासिक घटना

पद्मश्री शंकरबाबांनी सांगितले की, जन्मजात अंध आणि बेवारस मुलगी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्याची ही भारतातील पहिलीच ऐतिहासिक घटना आहे. ती सुवर्णाक्षरात लिहिली जाईल. त्यांनी पुढे सांगितले की जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्वत: मालाचे कौतुक केले असून, तिच्या यशाबद्दल अभिनंदन व्यक्त केले आहे.या नियुक्तीमुळे माणुसकीवरील विश्वास दृढ झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. मालाचे यश हे तिच्या परिश्रम, जिद्द आणि शंकरबाबांसारख्या मार्गदर्शकांच्या नि:स्वार्थ सेवेमुळे शक्य झाले आहे.

### मुख्यमंत्र्याच्या हस्ते मिळणार नियुक्तीपत्र

शारीरिक मर्यादा आणि अनाथत्व असूनही मालाने हार मानली नाही. 2019 पासून तिने एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांचा प्रयत्न सुरू केला. 2023 मध्ये 'ग्रुप सी'मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन ती नियुक्तीच्या प्रतीक्षेत होती. अखेर तिची महसूल सहायक म्हणून नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्ती निश्चित झाली आहे. सोमवारी 54 उत्तीर्ण उमेदवारांच्या नियुक्ती प्रक्रियेअंतर्गत कागदपत्र पडताळणी झाली. यावेळी शंकरबाबा पापळकर स्वत: मालासोबत होते. लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मालाला नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, हॉटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मुंबईची कबुतरे आणि दिल्लीचे भटके कुत्रे!

काही आठवड्यापासून राज्य सरकार आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार मुंबईतील सार्वजनिक ठिकाणी कबुतरखान्यांवरील कबुतरांना दाणे घालण्याऱ्यांवर महापालिकेने कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमुळे सामाजिक, राजकीय असे अनेक मतभेद निर्माण झाले. तर आरोग्य तज्ज्ञांनी कबुतरांच्या झपाटयाने वाढणा ?या संख्येवर आणि त्यांच्या पंख आणि विष्ठेमुळे माणसांना होणारे फुफ्फुसांचे आजार हे चिंताजनक कारण म्हटले आहे.

------------







मुंबईतल्या दादरमधील कबूतरखाना बंद करण्याच्या आदेशानंतर कबुतरांचा मुद्दा राज्यात चर्चित झाला आहे. जैन धर्माप्रमाणे कबुतरांना दाणे खाऊ घालण्याची पद्धत 'जीवदया' मानली जाते.

विद्यमान परिस्थितीत मुंबई आणि परिसरात पन्नासहून अधिक कबूतरखाने आहेत. जैन धर्माप्रमाणे कबुतरांना दाणे खाऊ घालण्याची परंपरा जुनीच आहे. मात्र कबुतरांची झपाट्याने वाढणारी संख्या आणि त्यांचे पंख आणि विष्ठेमुळे मानवी फुफ्फुसांच्या आजारांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले आहे.

यावर उच्च न्यायालयाने मानवी आरोग्य हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असल्याचे सांगत माणूस आणि प्राणी या दोघांच्या हक्कांमध्ये संतुलन राखणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. न्यायालयाने कबूतरखाने हटविण्याची कारवाई थांबविली आहे. मात्र दाणे घालण्याची परवानगी दिली नाही अर्थात बंदी कायम आहे.त्यामुळे कबुतरे दान्यांपासून वंचित आहे.

एकीकडे प्राणीमात्रांविषयी असलेल्या जीव दयेचा प्रश्न,तर जैन समाजाच्या भावनेचा प्रश्न, तर दुसरीकडे लोकारोग्याचा प्रश्न असा तिहेरी गुंता सोडविण्याचे कार्य न्यायालय, महापालिका प्रशासन,कबुतर प्रेमी, आरोग्य तज्ञ यांच्या समन्वयातून लवकरच सुटेल अशी अपेक्षा आहे. कबुतरांना दाणे खाऊ घालण्याच्या परंपरेला छेद न देता कबुतरांच्या वाढत्या संख्येचे नियंत्रण आणि कबुतरांच्या विष्टेमुळे मानवी श्वसनासंबधीच्या आजारांचा प्रश्न कसा सुटेल हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

कबुतरांचा मुद्दा सध्यातरी मुंबई पुरता चर्चित असतांना देशाच्या राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांची वाढत्या संख्येमुळे व त्यांच्या उच्छादाने चर्चेली जात आहे. भटक्या कुत्र्यांच्या उच्छादाच्या बातमीची दखल स्वतःसर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे.

भटक्या कुत्र्यांना पकडून आठ आठवड्याच्या आत (शेल्टर होम) निवारा केंद्रामध्ये ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या पाठोपाठ राजस्थान मध्येही उच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे आदेश दिले आहे. हे आदेश देत असताना सर्वोच्च न्यायालय म्हटले आहे की, कोणीही भटक्या कुत्र्यांचे शिकार होता कामा नये. सार्वजनिक क्षेत्रातून हटवलेली कुत्री निवारा केंद्रात सोडल्यानंतर पुन्हा रस्त्याला सोडू नये. शिवाय या कार्यवाहीत जे अडसर ठरतील, त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होईल असे न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे.

एका आकडेवारीनुसार आठ लाखांहून अधिक भटकी कुत्री दिल्ली व एनआरसी परिसरात आहे.तर देशात सहा कोटींहून अधिक भटकी कुत्रे आहेत.देशात प्रति सेकंदाला एक व्यक्ती कुत्रा चावल्यामुळे बळी ठरतो.तसेच रेबीजमुळे दर तीन तासात किमान दोन लोकांचा मृत्यू होतो. दररोज पंधरा हजार टनापेक्षा जास्त कुत्र्यांची विष्ठा आणि आठ दक्षलक्ष गॅलन लघवी रस्त्यावर आणि मोकळ्या मैदानात टाकली जाते. याकडे पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने संकट म्हणून बघायला हवे.

आज प्राणी हक्कांच्या विषयामुळे भटक्या कुत्र्यांची निर्बिजीकरणास निर्बंध येतात. आपल्या सभोवतालं असंख्य जण पाळीव कुत्र्यांना मोकाट सोडून देतात. जी काही नियम बंधने आहेत त्यावर अंमलबजावणीचा अभाव दिसतो. अनेक श्वानप्रेमी भटक्या कुत्र्यांना सामूहिकरीत्या खाद्य पुरवितात अशांनी कुत्रा पालनाची हौस घरीच बाळगावी.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote1979
@gmail.com

भटके कुत्रे कळपाने राहून अनेकांवर आघात करीत असतात. याउलट पाळीव कुत्र्यांचे तसे नसते. हे सामाजिक भान आज सर्वांनी स्वीकारायला हवे.

भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ राजधानी दिल्ली पुरती नसून आपल्या गल्ली, चाळी, बोळी, सोसायटी, पायवाट, महामार्ग, चौक, नाक्यावरची सुद्धा आहे.

भटक्या कुत्र्यांची झुंडी आपणास अनेक ठिकाणी बघायला मिळतात. येणाऱ्या जाणाऱ्यांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळेकरी मुले, दिव्यांग, महिलांना ही भटके कुत्रे लक्ष्य करतात.

दुचाकी, चारचाकी वाहनाच्या मागे धावतात.परिणामी अपघातही मोठ्या संख्येने होतात. अलीकडेच बिहारच्या गोपाळगंज येथील मनोरुग्ण महिलेवर रात्रसमयी तब्बल बारा कुत्र्यांनी हल्ला केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. शिवाय यासारख्या असंख्य बातम्या दररोज प्रसारमाध्यमातून वाचायला मिळतात.

आज भटक्या कुत्र्यांचा उच्छांद एवढा उच्चकोटीला गेला आहे की, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपासून तर उशिरा कामावरून परत येणाऱ्या लोकांपर्यंत भटकी कुत्री समूहाने हल्ला करतात. या घटना सोबतच त्यांच्या बद्दलची दहशत व शिवाय त्यांच्या मलमूत्रांमुळे पर्यावरणीय धोका वाढत आहे. तसेच आरोग्याच्या नवनव्या समस्या निर्माण करीत आहे.

याकडे कळीचा मुद्दा म्हणून बघण्यास हरकत नाही. करिता आज पाळीव प्राण्याच्या संदर्भात देशात एक राष्ट्रीय कायदा असायला हवा. जेणेकरून प्राणी हक्क आणि मानवी आरोग्य अबाधित राहील.

प्रश्न मुंबईच्या कबुतरांचा असो किंवा भटक्या कुत्र्यांचा तो शासन, प्रशासन, पशुप्रेमी, पर्यावरणवादी संस्थांनी, सुज्ञ नागरिकांनी समन्वयातून सोडवायला हवा. इथे न्यायालयाचा अमूल्य वेळ खर्च व्हायलाच नको!

---

# विकृतीवर घणाघात करणारी आशयघन कविता : अस्वस्थ





अस्वस्थ हा कवी कैलास भाले यांचा दुसरा दमदार कविता संग्रह आहे. त्यांनी अफाट दुःखाचा कटू अनुभव घेऊन त्याचा सत्त्वसार आपल्या कवितांमधून मांडला आहे. ह्यह्यमाज्याकडे सुखाने कायमची पाठ फिरवली! असं मनोगतात म्हणणारा हा मूल्यधर्मी कवी, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षितांचं दुःख आपल्या कवितेच्या कवेत घेऊन त्यावर फुंकर घालतो ही बाब स्तुत्य आहे।

या कवीने अस्वस्थ होत अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. जेव्हा सर्जनोत्सुक मन अस्वस्थ असतं, तेव्हाच दमदार कविता साकारत असते. लेखणी झुंजार बनत असते.

*झुंजार लेखणीला हरणे, कबूल नाही*
*झुंजार लेखलीला झुरणे कबूल नाही!*

(सूर्यकुलं पृष्ठ. ७०)

कैलास भाले झुंजार लेखणीचे धनी आहेत. त्यांनी आधी सगळ्यांचं भलं करून, मग आमचंही भलं कर असं म्हणणाऱ्या आपल्या विशाल मनाच्या आईचं कसदार, सत्त्वशील दूध पचवलं आहे. श्रमधर्मी बापाचे कष्ट त्यांना आठवत राहतात. कैलास भाले आपल्या कवितेतून मोठा आशय मार्मिकर्तने वाचकांसमोर ठेवतात. ह्यपहाटह्ण कवितेत ते म्हणतात...

*तुला पाहून माझ्यात*
*नरत्व*
*आणि मला पाहून तुझ्यात*
*मादीत्त्व जागं होतं*
*तर मग चल ना*
*जातीभेदाची पहाट होण्याआधीच्या*
*त्या अंधारात...*

कवितेवर प्रतेक कवी कविता लिहितोच लिहितो.

*कविता-*
*ममतेचा पंख*
*गर्जनेचा शंख*
*बंडाचा डंख असते।*
*(ठिणगी पृष्ठ. ३)*

हे ठाऊक असल्याने कैलास भाले वेगळ्या धाटणीची, घुसमट अक्षरबद्ध करणारी कवी नावाची कविता लिहितो.

कैलास भाले नावाचा चिंतनशील कवी आपल्या शैलीत व्यक्त होतो. तो म्हणतो..

विस्तारित शहराच्या वळणासाठी

*रेखांकित भूसंपादनात,*
*मांगवाडा उध्वस्त होईल*
*पण कुत्र्यासाठी हातातल्या*
*काठीची, सँगिणी होवो*
*दुःख ओले झेलताना*
*मोडलेला माणूस उभा राहो.*

अशी अभिलाषा वंदनीय आहे.

चळवळ या कवितेत हा निर्भीड कवी मुखवटा लाऊन विद्रोही भाषण करून मोर्चेकऱ्यांना भडकवणाऱ्या नेत्याला अनावृत्त करत त्याचा मुखवटा टराटरा फाडून टाकतो! पोतराजला समज देत अंधश्रध्देला सुरंग लावतोः वाघ माती या विचार कविताही चिंतनीय आहेत.

उकल या आशयघन कवितेत कवी म्हणतो..

तुझी भूतदया अशी की

*गाईला चारा टाकून तू*
*ठेवलं पाखरांना पाणी*
*कुत्र्याला भाकर टाकून*
*मुग्यांना साखर ठेवली*
*पण मग दलितांची घरं*
*गावाबाहेर कशी?*

अद्भुत भूतदयेचं भूत उतारत कवीचा हा प्रश्न खूप गहन आहे.

भाव कवितेत अडते, दलालांना अनावृत्त करत काटा आपला आणि तोल त्यांचा म्हणत अन्नदात्याची तरफदारी भक्कमपणे करतो. काळ्या रुळाला ठोकरून स्वातंत्र्य, समता, बंधुतेसह न्यायाचा जयघोष बुलंद करणारा हा जिंदादिल कवी आहे! भेसळखोरांच्या उरात धडकी भरवण्याचं काम शस्त्र असलेली विद्रोही कविताच करू शकते; हे पटऊन देणारा हा डंखबाज कवी आहे !! या आशयघन सत्त्वशील कवितेने विद्रोही कवितेच्या समृद्ध दालनात मोलाची भर घातली आहे.

*अंगारा, धुपारा यावर*
*विश्वास न ठेवता हे युग*
*मंत्र-तंत्र खोटे,*
*महा खोटा जादूटोणा*
*विज्ञानाच्या सोटयाने खोटे सारे हाणा*

(रणांगण पृष्ठ ३८)

असा मंत्रघोष करण्याचे विज्ञानयुग आहे. याचे या कवीला ज्ञान आणि भान आहे. पर्यावरण वाचवणे हे भूमीसाठी फायद्याचेच आहे अशी या चिंतनशील कवीची भूमिका आहे. आडदांड अंधारात उजेडाने तग धरावा म्हणून आपणच दान आणि दातृत्वाचे धनी बनले पाहिजे असं आवाहन कवीने केलंय. झेंडा, अण्णा, धाव या मर्मभेदक वास्तवतेच्या वेध घेणाऱ्या दमदार कविता आहेत.

परिवर्तन या कवितेत कवीने फार मोठा संदेश दिला आहे.

*ठेविले अनंते तैसेची राहावे*
*चित्ती असू द्यावे समाधान*
*या तत्वज्ञानाने बेचैन झालो तेव्हा*
*अंधारात जन्मलो तरी,*
*अंधारात मरणार नाही म्हणून*
*मूळ गाभ्यालाच हात घालून*
*अनुत्तरित प्रश्नांच्या शोधात*
*सोडली पायरी,*
*तर सुख-शांती-समाधानाचा प्रकाश*
*उत्तर बनून मलाच धुंडाळीत आला!*

ही कवितेवर अफाट प्रेम करणाऱ्या धेयधुंद कवीची अग्निधर्मी डंखबाज कविता आहे. कटी-मिठी, आलिंगन-चुंबनावर कविता करणाऱ्या, गुलछबू कवींना ती पचणार नाही.

थोर विचारवंत आ. ह. साळुंखे यांची पाठराखण हा या अग्नीची लाली मिरवणाऱ्या कवीला मिळालेला मोठा पुरस्कार आहे. विद्रोहाची, समतेची शंख गर्जना करणाऱ्या या कवीला भरभरून शुभेच्छा!



डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद.

---

# 'गोपाळकाला' उत्सवाचे बदलते स्वरूप!

श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. आता नवरात्रीप्रमाणे दहिहंडी उत्सवही राजकारणी आणि धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंड्या इच्छुक उमेदवारांसाठी प्रचाराचे मोठे साधन ठरणार आहेत. त्यामुळे दहीहंडी पथकाकांडून यंदा भरघोस कमाई केली जाणार हे निश्चित आहे. दहीहंडीच्या व्यासपीठावरून राजकीय फटाके फुटण्याची शक्यताही यंदा नाकारता येत नाही.

जो अधिक रकमेची बक्षिसे लावेल त्याच्या दहीहंडीला मोठ्या प्रमाणात गर्दी तर दिसतेच शिवाय वृत्तवाहिन्या, लोकल केबल नेटवर्कवाले अशा ठिकाणी पहाटेपासून दबा धरून बसलेली पाहायला मिळतात. लोकांनी अधिक गर्दी करावी यासाठी याठिकाणी सेलिब्रिटीजनाही अतिथी म्हणून बोलावले जाते. त्यांच्याकडून नृत्य करवून घेतले जाते, चित्रपटातील संवाद म्हणण्यास सांगितले जाते.

काही तरुण मंडळी तर खास या सेलिब्रिटी मंडळींना पाहण्यासाठी गर्दी करतात. गोविंदा पथक येतात, मनोरे रचतात, मोठे साहस करून अगदी वरच्या थराला पोहोचलेली किशोरवयीन मुले जमलेल्या जमावाला अभिवादन करतात; मात्र खास सेलिब्रिटींना पाहण्यासाठी आलेल्या मंडळींचे या गोविंदा पथकांकडे लक्षही नसते.

वृत्तवाहिन्या, केबल नेटवर्क यांचे कॅमेरेसुद्धा केवळ सेलिब्रिटींभोवतीच घुटमळत असतात. दहिहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्यासाठी राज्य सरकारच्या पुढाकारातून मागील काही वर्षांपासून मुंबईत प्रो कबड्डीच्या धरतीवर प्रो दहीहंडीचे आयोजन केले जात आहे. अर्थात याठिकाणी दहीहंडीच नसल्याने दहीहंडीच्या नावावर ती मानवी मनोऱ्यांची स्पर्धाच असले असेच म्हणावे लागेल.

दहीहंडी उत्सवाच्या दिवशीही पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते. ज्या ठिकाणी दहीहंडीचा इव्हेन्ट बनवला जातो त्या ठिकाणी दहीहंडी केवळ नावाला उभी केलेली असते. अधिकाधिक थर लावा आणि तेव्हढ्या थरांसाठी नियोजित केलेली रक्कम घेऊन जा हा एकच कार्यक्रम याठिकाणी राबवला जातो. त्यामुळे याला उत्सव म्हणावे कि साहसी खेळाची प्रात्यक्षिके हाही एक प्रश्नच आहे.

राज्यसरकारने गोविंदा पथकांना लाखो रुपयांचे विमाकवच देऊन या मनोऱ्याच्या स्पर्धेला जणू प्रोत्साहनच देत असते.

आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहेत त्यामुळे दहीहंडीही यातून सुटलेली नाही. मुंबईत महिला गोविंदा पथकांची संख्याही वर्षागणिक वाढू लागली आहे. ज्या ठिकाणी महिला गोविंदा पथक हंडी फोडण्यास येतात अशा ठिकाणी बघ्यांची गर्दी जरा जास्तच झालेली पाहायला मिळते. यामध्ये आंबट शौकीनही असतात.

श्रीकृष्णाने बालगोपाळांसह हंड्या फोडून लोणी खाल्ल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे; मात्र गोपिकांनी त्याकाळी असे काही केलेले नाही, त्यामुळे दहीहंडी उत्सवाकडे धार्मिक उत्सव म्हणून पाहायचे असेल, तर किमान महिलांच्या हंडीची तरी या उत्सवामध्ये गणना करू नका. श्रीकृष्णाचे सवंगडी विविध वर्णातील तर होतेच शिवाय त्यातील अनेक जण खूपच गरीब होते. आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश श्रीकृष्णाने गोपाळकाल्याच्या माध्यमातून दिला आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक भेदांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत. आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते.

पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया !

---

## वाचक लिहितात

### विरोधी पक्ष सक्षम असावा!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात द्विपक्षीय प्रणाली आहे एक सत्ताधारी व दुसरे विरोधी पक्ष. यांची निवड लोकांमधून निवडणूक आयोगाच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या निवडणुकीतून होते.

सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे, त्यांच्या चुकीच्या निर्णयावर बोट ठेवणे आणि जनहितासाठी आवाज उठवणे हे विरोधी पक्षाचे काम आहे.

सध्याची स्थिती पाहता विरोधी पक्ष केवळ आणि केवळ सत्ताधारी पक्षावर बिनबुडाचे आरोप करत आहे. राष्ट्रहिताच्या विरोधात बोलताना आणि वागताना दिसत आहे. देशाच्या सुरक्षेसाठी जीवावर उदार होऊन लढणाऱ्या सैनिकांविषयी अपमानास्पद विधाने केली जातं आहेत.

त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे.

सध्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात सर्वात मोठ्या पक्षाचे नेते आणि ज्यांना राजकीय धुरंदर असे म्हटले जाते ते ईव्हीएम मशीन वर अक्षेप घेत आहेत. निवडणूक जिंकली की ईव्हीएम बरोबर आहे आणि ती हारली तर ईव्हीएम मुळेच हरली असे सर्वत्र सांगितले जाते.

देशात विरोधी पक्ष हा सक्षम असावा. विरोधी पक्ष सक्षम असल्यास सत्ताधारी जनहितासाठी दक्ष राहतात. विरोधी पक्षाचा वचक नसेल तर सत्ताधारी बेलगाम होऊ शकतात त्यामुळे काँग्रेससह मित्र पक्षांनी विरोधी पक्ष म्हणून सक्षमपणे काम करावे असेच जनतेला वाटते.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

### इस्लामिक आक्रमकांच्या कबरीचे जतन -सरकारी तिजोरीतून?

इस्लामिक आक्रमकांच्या कबरीचे जतन सरकारी तिजोरीतून केल्या जाते. या आशयाची बातमी एका वृत्तपत्रात वाचनात आली. भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभागाने २०१०-११ ते २०२४-२५ या १५ वर्षांच्या कालावधीत हिंदुंवर अत्याचारांचे प्रतीक असलेल्या देहलीतील ऐतिहासिक इस्लामिक वास्तुंवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला .अशी माहिती माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झाली, असे त्यात नमूद केले होते. देशातल्या प्रत्येक नागरीकाला झोपेतून खडबडून जागे करणारी ही बातमी आहे. हा खर्च सर्वसामान्य व्यक्तीच्या करातूनच निश्चितपणे केला जातो. आपण या आक्रमकांच्या वास्तू जतन करण्यासाठी कर देतो का?

पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग केंद्र शासनाच्या आधिन आहे. प्रत्येक प्रस्तावित खर्चाकरीता तरतूद करावी लागते, तेंव्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लक्षात ही तरतूद कशाकरता केली आहे, हा भाग आला नाही का? इस्लामी वास्तूंना, कबरींना कोट्यावधी रुपयांचे सहाय्य करणे हे धर्मनिरपेक्षते च्या व्याख्येत बसते का? ही सरकारची उदासीनता की, प्रशासकीय उदारीकरणाची निष्पत्ती आहे. भारतीय नोटेवर असलेल्या अशोक स्तंभासाठी गेल्या काही वर्षात एकही पैसा खर्च केला गेला नाही.

शिवाजी महाराजांच्या गडकोटांसाठी अशी कोट्यावधीची रक्कम कधीच एक रकमी दिली जात नाही. शिवाय त्या गडांवर कबरीच्या संरक्षणावर वारेमाप खर्च होतो आणि हा सर्व पैसा आपल्या कराच्या पैशातून दिला जातो. आपल्या अमरनाथ, कैलास यात्रेला आर्थिक सहाय्य किंवा सवलत मिळत नाही, पण मक्केसाठी मात्र निधी दिला जातो. चूक आपलीच आहे. आपणच आपले अधिकार मागण्यात कमी पडतो. पण आता शांत न बसता आपण जाब विचारलाच पाहिजे? तरच याला कुठे ना कुठे आळा बसेल. आपल्याकडे मंदिरांना भक्ताचा पैसा आपण वापरतो आणि मोगली आक्रमक यांच्या वास्तूंना आणि कबरीसाठी सरकारी पैसा मिळतो हेच या देशाचे दुर्दैव आहे. हा इतिहास आहे की, या आक्रमकांचे वारसदार त्यांचा वारसा पुढे चालू ठेवून पुढे लव्ह जिहाद, लॅंड जिहाद, हलाल सर्टिफिकेट सारखी समांतर व्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळी करण्यासाठी तसेच कबरीचे उदात्तीकरण व्हावे यासाठी ते प्रयत्नरत आहेत. वक्फ कायदा जो हिंदुंच्या जिवावर उठला आहे, पुरातन मंदिर, शेती, जनतेची मालमत्ता वक्फ कायद्यांतर्गत ताब्यात घेतली जाते, हा जुलमी कायदा निरस्त करण्या बाबतचे काय?, हिंदू जनतेच्या संरक्षणाचे काय ? शेकडो शेतकरी आत्महत्या करतात आहे त्यांना द्यायला पैसा नाही .हे मुलभूत प्रश्न सोडविण्यापेक्षाही आतंकवाद्यांच्या कबरीचे संरक्षण महत्वाचे आहे का ? देशातील सर्व प्रश्न सुटले का ? असा प्रश्न आमच्या सारख्या सामान्य नागरिकांना पडतो. याचे उत्तर शासना कडून अपेक्षित आहे.

■ शशिकांत पाध्ये, वर्धा.

---

# हार्ट अटॅकपासून वाचण्यासाठी सोप्पा उपाय



तरुणांना कमी वयात हृदयविकाराने ग्रासलेले पहायला मिळत आहे. त्याच मुख्य कारण हाय कोलेस्ट्रॉल म्हटले जात आहे. हाय कोलेस्ट्रॉल वाढण्याचे सर्वात मोठे कारण अनहेल्दी आहार आणि शारिरीक निष्क्रीयता आहे.

लोक नेहमीच पिज्झा, बर्गर, चीझ, बटर, तेलकट पदार्थ, फ्राईड पदार्थ, रिफाईंड वस्तू, प्रोसेस्ड पदार्थ जास्त प्रमाणात खात आहेत आणि एक्सरसाईज करत नाहीत. त्यांच्यात हाय कोलेस्ट्रॉलची जोखीम खूप वाढली आहे.

अडचण ही आहे की हाय कोलेस्ट्रॉल वाढल्याचे आधी कळत नाही. तो हळूहळू हृदयाच्या धमन्यात वाढत असतो. आणि एकदिवस अचानक हार्ट अटॅक वा कार्डिएक अरेस्टचे कारण बनतो. अशात संशोधकांनी एक नामी उपाय शोधला आहे. जर रोज दोन अंडी खाल्ली तर हाय कोलेस्ट्रॉलची जोखीम खूप कमी होते. आणि अंततः यामुळे हार्ट अटॅकचा धोका कमी होतो.

**अंड्यांनी बॅड कोलेस्ट्रॉल वाढत नाही**

अमेरिकन जर्नल ऑफ क्लीनिकल न्यूट्रिशन प्रकाशित झालेल्या अहवालात सांगितले आहे की आधी अंडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल वाढतो अशी धारणा होती. परंतू ती धारणा चुकीची आहे. वास्तवात अंड्यांना जर मर्यादित प्रमाणात खाल्ले तर याने हाय कोलेस्ट्रॉल कमीच होते. संशोधकांनी अखेर स्पष्ट केले की अंडी बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाहीत. अभ्यासात असे आढळले की हार्ट अटॅकसाठी हाय कॉलेस्ट्रॉलहून अधिक जबाबदार सॅच्युरेटेड फॅट जबाबदार असते.

हृदय रोग जगभरात मृत्यूचे प्रमुख कारण आहे. हृदयाच्या आजाराने दरवर्षी सर्वाधिक लोकांचा मृत्यू होतो. डब्ल्युएचओच्या मते दरवर्षी जगातील सुमारे २ कोटी लोकांचा मृत्यू होतो.भारतात जेवढे मृत्यू होतात त्यातील २५ टक्के मृत्यू हार्ट डिसीजने होतात.

**सॅच्युरेटेड फॅटमुळे हार्ट डिसिज**

जगात पहिल्यांदा साऊथ ऑस्ट्रेलिया यूनिव्हर्सिटीच्या संशोधकांना हे संशोधन केले की डाएटमध्ये असलेले कोलेस्ट्रॉल आणि सॅच्युरेटेड फॅच वेगवेगळ्या रुपाने बॅड कोलेस्ट्रॉल म्हणजे एलडीएला कसे प्रभावित करतात. जर कोणी रोज दोन अंडी खात असेल तर हार्ट डिसीजचा धोका कमीच होतो, कारण अंड्यात सॅच्युरेटेड फॅट कमी असते.

मुख्य संशोधक प्रो.जॉन बकली यांनी सांगितले की अंड्यांसंदर्भातील जुन्या आणि चुकीच्या समजूतीने त्यांना बदनाम केले गेले. परंतू अंडे अनोखे आहे. यात बेशक कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जादा असते. परंतू यात सॅच्युरेटेड फॅट कमी असते. सॅच्युरेटेड फॅट कमी असल्याने ते हाय कोलेस्ट्रॉलला नियंत्रित करते.

या संशोधनात आम्ही कोलेस्ट्रॉल आणि सॅच्युरेटेड फॅटच्या परिणामांना वेग-वेगळ्या प्रकारे पाहीले आणि अंड्यातून मिळणारा अधिक आहार कोलेस्ट्रॉल, जेव्हा कमी सॅच्युरेटेड फॅट वाल्या आहाराच्या रुपात खाल्ला गेला, तेव्हा तो बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाही. ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### घरोघरी तिरंगा!

विविधतेत एकता ही
भारताची शान आहे
धर्म पंथ भिन्न असुनही
'तिरंगा' निर्विवाद आहे ..

व्यक्तिपेक्षा पक्ष मोठा
पक्षापेक्षाही देश
या राष्ट्रनिष्ठेमुळेच
अखंडीत आहे प्रदेश..

तिरंगा मुळेच आम्हाला
जगात मिळतो आदर
त्याची प्रतिष्ठा भंग पावेल
असं वागू नको ब्रदर।

# जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा इमारत केवळ नावालाच

## लाखों रुपये वेतनावर खर्च, फायदा मात्र शून्य ?




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.13 )**– कृषी विभागाच्या अंतर्गत असलेली जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा ही केवळ नावालाच कार्यरत असून, प्रत्यक्षात निष्क्रिय अवस्थेत आहे. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी उभारण्यात आलेली ही सुविधा आज केवळ सरकारी निधीचा अपव्यय व प्रशासनाच्या निष्क्रियतेचे प्रतीक ठरत आहे.

जैविक कीड नियंत्रण म्हणजे रासायनिक औषधांच्या ऐवजी नैसर्गिक व जैविक उपायांनी कीटक व्यवस्थापन करणे. हे तंत्र उत्पादन खर्च कमी करण्यास आणि पर्यावरण संवर्धनास मदत करते. या उद्देशाने अमरावती जिल्ह्यात अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली. इमारत बांधणी, उपकरण खरेदी आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची नेमणूक यासाठी लाखोंचा खर्च करण्यात आला.

मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून येथे कोणतेही जैविक घटक तयार होत नाहीत. परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांना या प्रयोगशाळेबाबत माहितीही नाही. तरीसुद्धा, येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना दरमहा लाखों रुपयांचे वेतन दिले जात आहे. खरीप हंगामात कीड नियंत्रणाचे आव्हान मोठे असताना प्रयोगशाळा बंद अवस्थेत असणे हे प्रशासनाच्या उदासीनतेचे लक्षण मानले जात आहे.

### अश्या आहेत शेतकऱ्यांच्या मागण्या

शेतकरी मागणी करत आहेत की, प्रयोगशाळा तातडीने सुरु करून जैविक बुरशी, ट्रायकोडर्मा, निंबोळी अर्क, वाफसिडी यांसारखी उत्पादने तयार करून त्यांचे वितरण व्हावे. तसेच कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून कार्यक्षमता वाढवावी. जिल्हा प्रशासनाने याबाबत त्वरित पावले उचलावी, अन्यथा शेतकऱ्यांचे नुकसान सुरूच राहील.

प्रयोगशाळा उभारण्यात आली खरी, पण तिचे व्यवस्थापन व कार्यपद्धती पूर्णपणे अपयशी ठरली आहे. शेतकऱ्यांसाठी ही सुविधा उपयुक्त ठरायला हवी होती, पण सध्या फक्त इमारत उभी आहे आणि कर्मचारी वेळ घालवतात.

**राहुल खापरे,**
**शेतकरी, निंभोरा पूर्णा.**

# अमरावतीत गुन्हेगारीला पालकमंत्र्यांचा छुपा आश्रय?

## युवक काँग्रेसचे टीकास्त्र









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )**– अमरावती शहरात गेल्या काही महिन्यांत गुन्हेगारी, नशा, जुगार, वेश्याव्यवसाय आणि अवैध मद्यविक्रीचा खुलेआम व्यापार सुरू आहे. विशेषत: पब-बारच्या आहारी जाणारी तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात सापडत आहे. ही परिस्थिती समाजाच्या पाया पोखरणारी असल्याने साधू-संत, महिला कार्यकर्ते आणि विविध राजकीय संघटना रस्त्यावर उतरल्या. आंदोलने, जनआक्रोश आणि पोलिसांच्या धाडसी कारवाईनंतर अनेक पब-बार बंद करण्यात आले.

मात्र अलीकडेच पालकमंत्र्यांनी थेट किचन 365 पब अँड बार ला दिलेली भेट धक्कादायक असल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला आहे. ज्या ठिकाणी पोलिसांचे धाडसत्र सुरू आहे, त्या ठिकाणी राज्याचे पालकमंत्री उपस्थित राहणे, हे अवैध धंद्यांना मान्यता देण्यासारखे आहे, असा सवाल त्यांनी केला.

युवक काँग्रेसचे नेते म्हणाले, एकीकडे पोलीस गुन्हेगारी थांबवण्यासाठी झटत आहेत, तर दुसरीकडे मंत्री अशा ठिकाणी भेट देतात. हा प्रकार पोलिस दलाच्या आत्मसन्मानावर आघात असून, अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोधैर्य वाढवणारा आहे. ही भेट समर्थनाचा संकेत असेल, तर प्रशासनाची कारवाई केवळ दिखावा आहे का ?

### युवक काँग्रेसचा इशारा

जर पालकमंत्री अशा धंद्यांना संरक्षण देत असतील किंवा कारवाईला अडथळा निर्माण करत असतील, तर 'जवाब दो' आंदोलन छेडले जाईल. हे केवळ घोषणांपुरते नसेल, तर जनजागृती आणि कठोर पावले उचलली जातील. व्यसनमुक्त, गुन्हेमुक्त अमरावती ही आमची जबाबदारी आहे, असा इशारा युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, सागर कलाने, योगेश बुंदेले, आशिष यादव, निखिल बिजवे, संकेत साहू यांनी दिला.

# एसटी महामंडळाची परवडणारी पॅकेज टूर योजना



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि. 13 )** – महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांना स्वस्त आणि आरामदायी प्रवासाची संधी देण्यासाठी एसटी महामंडळाने पॅकेज टूर योजना सुरू केली आहे. यामध्ये निसर्गरम्य, धार्मिक तसेच इतर पर्यटन स्थळांचा समावेश असून, प्रवाशांना कमी खर्चात प्रवास करण्याची सोय उपलब्ध आहे.

मोर्शी आगाराच्या आगार व्यवस्थापक आशाताई वासनिक यांनी सांगितले की, इच्छुक 40 प्रवासी एकत्र येऊन महाराष्ट्रात कुठेही देवदर्शन व पर्यटन करू शकतात. या योजनेत अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी, कौंडण्यपूर, जहागीरपूर, कोंडेश्वर, अंबादेवी (अमरावती), चिखलदरा, मुक्तागिरी, बहिरम यांसह इतर स्थळांचा समावेश आहे. पॅकेज टूरचे बुकिंग एसटीच्या वेबसाइटवर, अ‍ॅपवर किंवा जवळच्या आगारात करता येते. ऑनलाइन बुकिंगसोबतच योजनांची सविस्तर माहितीही उपलब्ध आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी मोर्शी आगार व्यवस्थापक आशा वासनिक (मो. 9545723546) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वरुडमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त भव्य तिरंगा बाईक रॅली

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.13 )** – स्वातंत्र्यदिनानिमित्त वरुड शहरात देशभक्तीचा जल्लोष रंगणार आहे. वरुड व्यापारी संघ, कन्फेडेरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स, द ग्रेट मराठा फाउंडेशन आणि विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने 15 ऑगस्ट रोजी शहिदांच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 8.50 वाजता वरुड व्यापारी संघाचे ज्येष्ठ सदस्य किशोर खंडेलवाल यांच्या हस्ते ध्वजारोहणाने होईल. सकाळी 10 वाजता नगरपरिषद कॉम्प्लेक्स येथून बाईक रॅलीला प्रारंभ होऊन ती शहरातील प्रमुख मार्गांवरून फेरी मारेल. 'स्वदेशी वापरा, विदेशीला हाकला' अशा घोषणा दिल्या जाईल, कॉम्प्लेक्स परिसरात स्वदेशी वस्तूंची विशेष प्रदर्शनी भरवली जाणार आहे.दुपारी 2 वाजता व्यापारी संघाचे संस्थापक पदम कुमारजी जैन (88) यांचा सत्कार होईल. या उपक्रमासाठी गिरीधर देशमुख, जगदीश उपाध्याय, रितेश शाह व नितीन गुर्जर यांनी नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# शिवाजी शाळेत ऑगस्ट क्रांती दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.13 )** – 1942 साली महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या ऐतिहासिक आठवणी जागवत, स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत ऑगस्ट क्रांती दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. विद्यार्थ्यांनी ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्त्व उलगडणारी भाषणे केली तसेच देशभक्तीपर गीते सादर करून वातावरण राष्ट्रभक्तीने भारून टाकले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मोर्शी शहरातील जयस्तंभ चौकातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण केले.

शाळेच्या एनसीसी कॅडेट्सनी गांधी पुतळ्याच्या परिसरात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्य संग्रामाची प्रेरणा आणि नागरिक कर्तव्याची जाणीव दृढ झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार संजय गारपवार, दिनेश मिश्रा, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक विठ्ठल नवरे, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी आणि अजय हिवसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्ता सावरकर यांनी केले, प्रास्ताविक डॉ. संगीता हेडाऊ यांनी तर आभार पवन भागवत यांनी मानले. यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# विभागात 'हर घर तिरंगा'अभियान उत्साहात राबवा!

**अमरावती**– देशभक्तीचे वातावरण निर्माण करण्यासाठी व तिरंगामय देश घडविण्यासाठी 15 ऑगस्टपर्यंत 'हर घर तिरंगा' अभियान राज्यभर राबविले जात आहे. अमरावती विभागात हे अभियान अधिक प्रभावीपणे पार पडावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, विभागीय कार्यालयांचे प्रमुख उपस्थित होते. अभियान तीन टप्प्यांत पार पडत असून तिसरा टप्पा 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान सुरू आहे. या मोहिमेत तिरंगाविषयी जनजागृतीसाठी चित्रकला, रांगोळी, प्रभातफेरी, स्वच्छता मोहीम, रोषणाई, तिरंगा बाईक किंवा सायकल रॅली, तसेच तिरंगा यात्रांचे आयोजन करण्यात यावे. महिला बचत गटांकडून तिरंगा निर्मिती व विक्री करून तो सहज उपलब्ध करून द्यावा, असेही निर्देश देण्यात आले. शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घर, कार्यालय, वाहनांवर तिरंगा फडकवावा तसेच ध्वजारोहणाचे सेल्फी [www.harghartiranga.com](http://www.harghartiranga.com) वर अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले.

# न्यायालयीन लढाईतून उभा केलेला कोंडवाडा आज दुरवस्थेत

## गुरांना चारा-पाण्याचा वानवा; ग्रामस्थांचा संताप उफाळला

*सलिल काळे*

*धामणगाव रेल्वे, ( दि.13 ) - काही वर्षांपूर्वी न्यायालयीन संघर्षातून उभारला गेलेला व लाखो रुपयांचे वार्षिक उत्पन्न देणारा झाडा ग्रामपंचायतीचा कोंडवाडा आज चारा-पाण्याअभावी गुरांच्या हालअपेष्टांचे केंद्र बनला आहे. राज्य सरकारकडून 'आदर्श यशवंत ग्रामपंचायत'म्हणून गौरविले गेलेल्या या प्रशासनाकडेच आता स्वत:च्या कोंडवाड्याची दुरवस्था झाल्याचे चित्र दिसते.*






### माजी सरपंचांची खंत

विजय उगले हे सध्या धामणगाव रेल्वे येथील जवाहर सहकारी सूतगिरणीचे उपाध्यक्ष असून, तेथे यशस्वीपणे नफ्यातील कामकाज सुरू आहे. मात्र त्यांनी संघर्षातून उभा केलेला कोंडवाडा आज दुरवस्थेत गेल्याने त्यांना आणि ग्रामस्थांना तीव्र खंत वाटत आहे. गुरांच्या चारा-पाणी समस्येचे तातडीने निराकरण करून कोंडवाड्याला पुन्हा पूर्वीप्रमाणे सुसज्ज करण्याची मागणी सर्वत्र जोर धरत आहे.

### ग्रामस्थांचा आरोप

ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर दुर्लक्षाचा आरोप करत, पुरस्कार मिळाल्यानंतर प्रशासन झोपेत गेले आहे काय ? असा सवाल केला आहे. तेजस महाजन व स्थानिक युवकांनी व्हिडिओद्वारे ही परिस्थिती मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. गोरक्षक दल व गौरक्षण संस्था यांनीही या विषयाची दखल घेण्याचे आवाहन केले आहे.

### आजची अवस्था वाईट

सध्या मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. गुरांना पुरेसा चारा नाही, पाण्याची टाकी निकृष्ट अवस्थेत आहे. अलीकडेच दीड लाख रुपयांचा चारा साठा विकल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. लाखो रुपयांचे उत्पन्न देणारा हा कोंडवाडा आज ओस पडला असून, पूर्वीची व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र आहे.

### संघर्षातून उभारणी

माजी सरपंच विजय उगले यांनी बीडिओ, सीओ आणि कमिशनर यांनी परवानगी नाकारल्यानंतर नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. हायकोर्टाने ग्रामपंचायतीच्या बाजूने निर्णय देत संबंधित तीन अधिकाऱ्यांचे वेतनवाढीचे हक्क रोखण्याचे आदेश दिले. अखेर कोंडवाडा सुरू झाला.

### कधी काळी आदर्श कोंडवाडा

सुरुवातीच्या वर्षातच तब्बल 15 लाख रुपये उत्पन्न झाले. पुढील दोन दशके दरवर्षी 11 ते 15 लाखांचे उत्पन्न ग्रामपंचायतीला मिळत राहिले. नागपूर, यवतमाळ, मोहगाव आदी ठिकाणांहून जनावरे आणली जात, तर वन विभागाने पकडलेली दीडशे जनावरे येथे ठेवण्यात आली होती. प्रती जनावर 150 रुपये वाहतूक भत्ता, 24 तास कोंडवाडा खुला, पौष्टिक चारा व स्वच्छ पाण्याची सोय, तसेच कसायाला जनावरे न विकण्याचा नियम यामुळे हा कोंडवाडा आदर्श ठरला होता.

# तालुक्यात राजरोसपणे अवैध वाळू उपसा

## ग्रामीण भागातील नदीपात्रात राजरोस वाळू उपसा

### महसूल व पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.13 )** – वाळूला सध्यास्थितीला सोन्यासारखा भाव मिळत आहे. रेतीला प्रति ब्रास 4 ते 5 हजार रुपये भाव मिळत आहे. अमरावती जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतील नदीपात्रात अवैध वाळू उपसा दिवसाढवळ्या सुरू आहे. महसूल, पोलिस आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे वाळूमाफियांचे मनोबल वाढले असून, ग्रामस्थांच्या तक्रारी असूनही कारवाई न होण्याने नाराजी वाढत आहे.

नदीपात्रातून मातीमिश्रीत वाळूचा मोठ्या प्रमाणात उपसा होत आहे. त्यामुळे पात्रात खोल खड्डे पडून पर्यावरणीय तोटा होत आहे. जिल्ह्यातील अनेक ठिकाणी प्रशासनाकडून वाळू धक्क्यांचे लिलाव करण्यात आले नाहीत, त्यामुळे बाजारात वाळूची मोठी मागणी आहे. या संधीचा फायदा घेत वाळूमाफिया दररोज ट्रॅक्टर, बैलगाड्या व इतर साधनांच्या सहाय्याने वाळू उपसा करून अमाप नफा कमावित आहेत. ग्रामस्थांनी वारंवार तालुका प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या, मात्र मिळणारी कारवाई ही फक्त थातूरमातूर असते. परिणामत: कारवाईनंतर दुसऱ्याच दिवशी पुन्हा अवैध वाळू उपसा सुरू होतो. त्यामुळे ग्रामस्थांतून जिल्हा प्रशासनाकडे लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### तहसील प्रशासनाची मूक संमती ?

एकीकडे जिल्हाधिकारी अवैध वाळू उपस्यावर कडक कारवाईचे आदेश देतात, तर दुसरीकडे त्यांच्या अखत्यारीतील तहसील प्रशासन मात्र राजरोसपणे सुरू असलेल्या उपस्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसते. गावालगतच्या नदीपात्रातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू काढली जाते, तर दिवसा वाहतूक उघडपणे सुरू असते. तलाठी, मंडळ अधिकारी ते तहसीलदार स्तरापर्यंत 'समजुतीने तडजोड' झाल्याची शंका ग्रामस्थांमधून व्यक्त होते.

### पोलिस-महसूल वाळू तस्कर साखळी

कुरलपूर्ण, मेघा, चारगड, पूर्णा आदी ठिकाणी नदीपात्रातून गेल्या अनेक दिवसांपासून विनापरवाना वाळूचा उपसा सुरू आहे. रात्री उपसा आणि दिवसा वाहतूक अशा साखळीदार पद्धतीने हा अवैध व्यवसाय फोफावत आहे. महसूल व पोलिस विभागाकडून होत असलेल्या सोईस्कर दुर्लक्षामुळे वाळूमाफियांना पूर्ण मोकळीक मिळाली आहे.

### प्रशासन आंधळे-बहिरे ?

ग्रामस्थांच्या मते, रात्री वाळू उपसा व दिवसा त्याची खुलेआम वाहतूक होत असताना प्रशासन आंधळे बहिरे बनले आहे. या सर्व प्रकारामुळे प्रशासनाचा ढिसाळ कारभार व वाळू माफियांचे बळकट जाळे उघड होत असून, तातडीने कडक कारवाई न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.




## गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको

चालणे, उठणे, बसणे, पायऱ्या चढणे, अशा प्रत्येक कामात गुडघे महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु वृद्धत्व आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे कधीकधी गुडघ्यातील तेलकटपणा कमी होतो. त्यात असलेले नैसर्गिक स्नेहन हळूहळू कमी होऊ लागते. परिणामी गुडघ्यांमध्ये वेदना, कडकपणा आणि चालण्यात अडचण येते.



गुडघ्यातील तेलकटपणा कमी होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे कार्टिलेजची झीज होणे आणि सायनोव्हियल फ्लुइड कमी होणे. परंतु योग्य वेळी लक्ष दिल्यास गुडघ्यांचे आरोग्य चांगले राखता येते.

गुडघ्यांमधील वंगण कमी का होते?

* **वृद्धत्वः** वयाच्या चाळीशीनंतर शरीरातील नैसर्गिक स्नेहन कमी होऊ लागते. त्यामुळे सांध्यातील कोरडेपणा आणि वेदना वाढतात.
* **जास्त वजन आणि लठ्ठपणाः** शरीराचे अतिरिक्त वजन थेट गुडघ्यांवर परिणाम करते. त्यामुळे कूर्चा लवकर झिजतात.
* **व्यायामाचा अभावः** नियमित हालचालींच्या अभावामुळे गुडघ्यांना स्नेहन प्रदान करणारे सायनोव्हियल फ्लुइड कमी होते.
* **चुकीच्या खाण्याच्या सवयीः** कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडचा अभाव हाडे आणि सांधे कमकुवत करतो.
* **दुखापत किंवा जुनी दुखापतः** गुडघ्यांमध्ये जुनी दुखापत किंवा संधिवाताची समस्येमुळे देखील स्नेहन कमी होऊ शकते.

व्याधी विकार

**डॉ. अमोल नाईकवाडे**

**गुडघ्यातील स्नेहनाचे संरक्षण आणि वाढ करण्याचे मार्ग**

* ओमेगा-३ फॅटी ॲसिडचे सेवन
* मासे, अळशीच्या बिया, अक्रोड यांसारखे पदार्थ गुडघ्यांमध्ये स्नेहन राखण्यास मदत करतात.
* हलका व्यायाम करा
* चालणे, सायकलिंग आणि योगा यांसारखे हलके व्यायाम गुडघ्यांमध्ये द्रव परिसंचरण सुधारतात.

**वजन नियंत्रणात ठेवा**

* शरीराचे वजन नियंत्रणात ठेवल्याने गुडघ्यांवर कमी दबाव येतो.
* कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी घ्या.

## मिळवा रागावर नियंत्रण

रोजच्या आयुष्यात राग येणं अगदी स्वाभाविक आहे. पण रागावर नियंत्रण मिळवणंही तितकंच गरजेचं आहे. रागाचा परिणाम तुमच्या आरोग्यावरच नाही तर नातेसंबंधांवरही होतो. त्यामुळे रागाचं व्यवस्थापन करण्याच्या या टिप्स तुमच्या कामी येतील.



मानसिक आरोग्य

* तुम्हाला एका विशिष्ट परिस्थितीत राग येतो किंवा काही गोष्टी मनाप्रमाणे घडल्या नाहीत तर चिडचिड होते. मात्र उगाचच रागावण्यापेक्षा किंवा चिडचिड करत बसण्यापेक्षा समस्येवर उपाय शोधणं गरजेचं आहे. समस्या कितीही जटील असली तरी सुटू शकते. त्यामुळे समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करा.
* रागाच्या भरात आपण बरंच काही बोलून जातो. या शब्दांमुळे समोरची व्यक्ती दुखावली जाते आणि नात्यांवर परिणाम होतो. त्यामुळे राग आल्यावर फार बोलू नका. शांत व्हा. राग कमी झाल्यावर स्वतःच्या भावनांना वाट करून द्या. शांतपणे चर्चा करा. आपली समस्या, प्रश्न किंवा व्यथा शांतपणे मांडा.
* राग येण्यामागच्या कारणांचा शोध घ्या. विशिष्ट प्रसंगी किंवा ठराविक कारणांमुळे राग येत असेल तर त्यावर उपाय शोधा. उगाचच रागावू नका. यामुळे तुम्ही परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळू शकाल. तसंच तुमच्या हातून कोणतीही चुकीची कृती घडणार नाही.
* राग आल्यावर कशा प्रकारे प्रतिक्रिया द्यायची हे ठरवा.

## २५ टक्के जोडपी लठ्ठपणाचे बळी

साधारणपणे २३ पेक्षा जास्त बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) भारतीयांसाठी लठ्ठपणाच्या श्रेणीत येतो. यामागे चुकीची जीवनशैली, फास्ट फूडचे जास्त सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव, झोपेचा त्रास आणि वाढता ताण अशी अनेक कारणे आहेत.



'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसीएमआर) च्या एका अभ्यासानुसार देशातील प्रत्येक चार विवाहित जोडप्यांपैकी एक लठ्ठपणाशी झुंजत आहे. लठ्ठपणामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब, टाइप-२ मधुमेह, फॅटी लिव्हर आणि अनेक प्रकारच्या कर्करोगांचा धोका वाढतो.

लठ्ठपणामुळे स्लीप ॲप्निया तसेच नैराश्य आणि आत्मविश्वासाचा अभाव यासारख्या मानसिक आरोग्यसमस्यादेखील उद्भवू शकतात.

जीवनशैली

**जोडप्यांचे वजन वाढण्याचे कारण काय?**

'आयसीएमआर'च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे, की लग्नानंतर जोडप्यांमध्ये वजन वाढण्याची समस्या सामान्य होत आहे. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे सामायिक जीवनशैली, म्हणजेच अनेकदा पती-पत्नी एकमेकांच्या खाण्याच्या सवयी स्वीकारतात.

**बाहेर खाणे**

रात्री उशिरा जेवण, कॅलरीयुक्त नाश्ता आणि गोड पेये वाढतात. लग्नाच्या सुरुवातीच्या काळात जोडप्यांचे सामाजिक जीवनदेखील अधिक सक्रिय असते. त्यात पार्ट्या आणि मेळाव्यांमध्ये अयोग्य खाण्याच्या सवयींचा समावेश असतो. याशिवाय जबाबदाऱ्यांमुळे शारीरिक हालचाली कमी होतात. व्यायाम आणि व्यायामासाठी वेळ काढणे कठीण होते.

**ते कसे टाळायचे?**

* संतुलित आहाराचा अवलंब करा
* घरगुती निरोगी अन्न खा आणि जंक फूडपासून दूर राहा.
* व्यायामासाठी वेळ काढा
* दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करा किंवा चालत जा.
* खाण्यासाठी एक निश्चित वेळ ठेवा
* रात्री उशिरा जेवणे टाळा.
* जोडप्यांनी एकत्रितपणे फिटनेस ध्येये निश्चित करावीत जेणेकरून प्रेरणा टिकून राहील.

## का जडतो उच्च रक्तदाब?

उच्च रक्तदाबाचा त्रास जडलेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अनेक तरुणांना उच्च रक्तदाब जडू लागला आहे. उच्च रक्तदाब हा जीवनशैलीशी संबंधित विकार असून यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळतं. दैनंदिन आयुष्यातल्या काही सवयी उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतात. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.



कुठे चुकतो आपण?

* बैठी जीवनशैली उच्च रक्तदाबाला निमंत्रण देते. सतत बसून राहिल्यामुळे ही व्याधी जडण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. बैठ्या कामामुळे शरीराभोवती चरबी साठू लागते. वजन वाढतं. आणि याची परिणती उच्च रक्तदाबामध्ये होते. उच्च रक्तदाबाचा धोका टाळण्यासाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल करणं गरजेचं आहे.
* मद्यपानामुळे उच्च रक्तदाबाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे मद्याचं सेवन प्रमाणात करा.
* मीठाचं अतिसेवन उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं हे आपण जाणतो. वेफर्स, फरसाण, लोणची, पापड, प्रक्रिया केलेले पदार्थ यामध्ये मिठाचं प्रमाण अधिक असतं. मिठाच्या अतिसेवनामुळे मूत्रपिंड पाणी राखून ठेवतात. यामुळे रक्तवाहिन्यांवरचा ताण वाढतो आणि उच्च रक्तदाब जडू शकतो.
* विशिष्ट औषधांमुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही औषध घेऊ नका.
* ताण हे सुद्धा उच्च रक्तदाबाचं महत्त्वाचं कारण ठरू शकतं. याशिवाय धूम्रपान, फळं आणि भाज्यांचं सेवन न करणं तसंच उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास यामुळेही ही व्याधी जडू शकते.

## सर्दीवर प्रभावी औषध

सर्दी-खोकला ही सर्वसामान्य व्याधी आहे. हवामानबदलाच्या काळात सर्दी-खोकला त्रास देतो. साध्या सर्दी-खोकल्यावर उगाचच औषधांचा मारा करण्यापेक्षा घरगुती उपाय करणं अधिक योग्य ठरतं. एक आयुर्वेदिक औषधी पेय सर्दी-खोकल्यावर परिणामकारक ठरू शकतं.



आयुर्वेद आणि विकार

आलं, दालचिनी, चक्रफूल, मध, ॲपल सिडर व्हिनेगार, लिंबाचा रस आणि पाणी असं साहित्य घ्या. आलं स्वच्छ धुवून घ्या. एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात आल्याचे काप घाला. दालचिनीच्या दोन कांड्या, दोन चक्रफूल घालून उकळून घ्या. १० मिनिटं बाजूला ठेवा. हे पाणी गाळून घ्या. त्यात प्रत्येकी दोन चमचे मध आणि ॲपल सिडर व्हिनेगार घाला. अर्ध्या लिंबाचा रस घाला. हे मिश्रण नियमितपणे प्या. हे औषध गरम किंवा थंड झाल्यावरही घेता येईल.

दालचिनी आणि आल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मध आणि चक्रफुलात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. याचा लाभ शरीराला होतो. हे औषध दोन दिवस फ्रीजमध्ये ठेवता येईल. दोन दिवसांनी ताजं औषध करून घ्या. यामुळे तुम्हाला बरेच लाभ होतील.

## ११मिनिटे चाला, व्याधी पळवा

चालणे अत्यंत फायदेशीर आहे. म्हणूनच आरोग्यतज्ज्ञ सर्व वयोगटातील लोकांना दररोज चालण्याचा सल्ला देतात. पायी चालणे ही सुदृढ राहण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी सगळ्यात चांगला व्यायाम मानला जातो. आता आणखी एक संशोधन समोर आले आहे. 'ब्रिटिश जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिन'मध्ये प्रकाशित झालेल्या लेखानुसार रोज केवळ ११ मिनिटे म्हणजे आठवड्यातून ७५ मिनिटे 'ब्रिस्क वॉक' केल्याने म्हणजे वेगाने पायी चालल्याने हार्ट स्ट्रोक आणि कर्करोगासारख्या आजारांचा धोका कमी होऊ शकतो. हे संशोधन जवळपास ३० लाख लोकांवर करण्यात आले. चालण्यामुळे आपल्या हृदयाचे आरोग्य, मानसिक आरोग्य आणि मूडदेखील सुधारतो. दररोज फक्त ११ मिनिटे चालल्याने शरीरात काही बाह्यबदलही दिसून येतात.



आरोग्य चर्चा

**डॉ. अजिंक्य बोन्हाडे**

**अकाली मृत्यूपासूनही बचाव**

रोज केवळ ११ मिनिटे वॉक करून कार्डिओव्हॅस्क्युलर व्याधींचा धोका १७ टक्क्यांनी आणि कर्करोगाचा धोका ७ टक्क्यांनी कमी होतो, असेही संशोधनात आढळून आले. शिवाय चालण्याने अकाली मृत्यूपासूनही बचाव केला होऊ शकतो.

**शरीरात नेमके काय आणि कसे बदल घडतात?**

आपण दररोज ११ मिनिटे चालतो तेव्हा आपल्या पाठीचे आणि पायांचे स्नायू मजबूत होतात. त्यामुळे पोश्चर सुधारते. याचा आपल्या व्यक्तिमत्त्वावर चांगला परिणाम होतो.

**वजन कमी होणे**

चालण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. शरीर अधिक तंदुरुस्त दिसते. अनेक अहवालांचे निकाल असे दर्शवतात, की चालण्यामुळे चयापचय वाढते.



## घट्ट पट्टा बांधणे हानीकारक

आजकाल लोक घट्ट बेल्ट बांधणे हे स्टाईल आणि स्मार्टनेसचे लक्षण मानतात. पण घट्ट बेल्ट घालणे हानिकारक आहे. घट्ट पट्टा घालताना पोट, कंबर आणि आजूबाजूच्या नसांवर जास्त दाब पडतो. त्यामुळे अन्न व्यवस्थित पचत नाही. गॅस आणि आम्लतेची समस्या उद्भवू शकते. जास्त वेळ घट्ट पट्टा घातल्याने पाठदुखी, मणक्यावर परिणाम आणि पाय सुन्न होऊ शकतात. ही समस्या हळूहळू गंभीर होऊ शकते. घट्ट पट्टा घातल्याने पेल्विक क्षेत्रावर म्हणजेच कंबर आणि खालच्या ओटीपोटावर जास्त दबाव पडतो. यामुळे त्या भागाच्या रक्ताभिसरणावर परिणाम होतो आणि तापमान वाढते. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, पेल्विक क्षेत्राचे तापमान सामान्यपेक्षा थोडे कमी असायला हवे. घट्ट पट्ट्यामुळे तापमानात वाढ झाल्यास शुक्राणूंची गुणवत्ता आणि संख्या दोन्ही कमी होऊ शकते.

चुकीच्या सवयी

**डॉ. कुंदन गायकवाड**

घट्ट पट्टा पोटाभोवतीच्या नसा आणि रक्तवाहिन्यांवर दबाव आणतो. त्यामुळे तिथे रक्त व्यवस्थित पोहोचू शकत नाही. रक्ताभिसरण मंदावते. घट्ट बेल्ट घातल्याने पचनसंस्थेवर 'टॉर्निकेट' लावल्याप्रमाणे दबाव येतो. यामुळे ॲसिड रिफ्लक्स, गॅस आणि अपचन सारख्या समस्या उद्भवू शकतात. बेल्ट घट्ट करताच श्वास घेण्यास किंवा हालचाल करण्यास त्रास होत असेल, पोटात किंवा कंबरेमध्ये वेदना होत असतील किंवा बेल्ट तुमच्या त्वचेवर खुणा सोडत असेल, तर समजून घ्या की बेल्ट खूप घट्ट आहे. बेल्ट पुरेसा सैल असावा जेणेकरून तुम्ही बसून सहज श्वास घेऊ शकाल.

## घामाची दुर्गंधी देते संकेत!

घाम येणे ही आपल्या शरीराची एक सामान्य प्रक्रिया आहे. जी शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते; परंतु घामातून विचित्र किंवा तीव्र वास येत असेल तर ते केवळ स्वच्छतेशी संबंधित नसून त्याचा एखाद्या आजाराशीदेखील संबंधित असू शकतो?



घामाचा वास कधीकधी शरीरातील अंतर्गत विकार दर्शवितो. तो फक्त साबणाने लपवता येत नाही. त्याचे नेमके कारण जाणून घेणे आणि त्यावर उपचार करणे खूप महत्त्वाचे आहे. घामाला गोड किंवा फळांचा वास येत असेल तर ते मधुमेहाचे लक्षण असू शकते. शरीरातील रक्तातील साखरेच्या असंतुलनामुळे हा वास येतो. याला 'किटोन श्वास' असेही म्हणतात. घामाचा वास अमोनिया किंवा लघवीसारखा तीव्र असेल, तर ते यकृत किंवा मूत्रपिंडाच्या कार्यात बिघाड झाल्याचे लक्षण असू शकते. शरीर कचरा पदार्थ योग्यरित्या बाहेर टाकू शकत नाही तेव्हा तो घामाद्वारे बाहेर पडतो. त्यामुळे वास येतो. जास्त घाम येणे आणि त्यातून येणारा वास हे थायरॉईडच्या समस्या किंवा हार्मोनल बदलांचे लक्षण असू शकते. हायपरथायरॉईडीझम असलेल्या लोकांना जास्त घाम येतो आणि शरीरातील रासायनिक बदलांमुळे वासदेखील तीव्र असू शकतो. बहुतेकदा जीवाणू किंवा बुरशी दुर्गंधीयुक्त घामासाठी जबाबदार असतात. शरीराचा घाम आणि त्वचेवर असलेले जीवाणू एकत्र आल्यावर एक वाईट वास निर्माण होतो. हा वास सामान्यपेक्षा जास्त असेल आणि बराच काळ टिकून राहिला, तर तो त्वचेच्या संसर्गाचे लक्षण असू शकतो.

जाणून घ्या

**डॉ. महेश दळे**

**उपाय काय आहे?**

नियमित आंघोळ करा आणि स्वच्छता राखा. संतुलित आहार आणि भरपूर पाणी पिणे महत्वाचे आहे. डिओ किंवा परफ्यूमने वास लपवण्याऐवजी त्याचे कारण शोधा. घामाचा वास असामान्य असेल तर डॉक्टरांकडून तपासणी करून घ्या.

## दुधाचा त्रास आहे?

अनेकांना दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ खाल्ल्यामुळे त्रास होतो. याला वैद्यकीय भाषेत 'लॅक्टोस इन्टॉलरन्स' असं म्हणतात. या व्याधीची किंवा समस्येची काही लक्षणं आहेत. या लक्षणांविषयी...

लॅक्टॉस हा नैसर्गिक साखरेचा एक प्रकार आहे. दुधात ही साखर आढळते. लॅक्टेस हे पाचक रसायन लॅक्टॉसचं विघटन करतं. यामुळे लॅक्टॉसचं सुलभपणे पचन होतं. मात्र शरीर पुरेशा प्रमाणात लॅक्टेसची निर्मिती करत नसेल तर लॅक्टॉस पचनात अडथळे निर्माण होतात आणि लॅक्टॉस इन्टॉलरन्सची समस्या निर्माण होते. लॅक्टॉस इन्टॉलरन्स ही सर्वसामान्य समस्या आहे. जगभरातल्या जवळपास ७० टक्के लोकांना हा त्रास असतो. हायड्रोजन ब्रेथ चाचणीद्वारे या समस्येचं निदान होतं. लॅक्टॉस इन्टॉलरन्सचा त्रास कमी करण्यासाठी दूध तसंच दुग्धजन्य पदार्थांचं सेवन कमी करायला हवं.

आरोग्यवेध

**लॅक्टॉस इन्टॉलरन्सची लक्षणं**

लॅक्टॉस इन्टॉलरन्समुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात. बद्धकोष्ठता, पोट फुगणं, पोटावर ताण येणं अशी लक्षणं दिसू लागतात. पूर्णपणे न पचलेली लॅक्टॉस मोठ्या आतड्यात साठते. इथे तिच्या आंबण्याची प्रक्रिया सुरू होते. यामुळे निर्माण होणाऱ्या मिथेन वायूमुळे पचनशक्तीवर परिणाम होतो. परिणामी, बद्धकोष्ठतेचा त्रास होतो. अर्थात बद्धकोष्ठतेची इतरही कारणं आहेत. तंतूमय पदार्थांची कमतरता, पाण्याचं कमी प्रमाण यामुळेही बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे बद्धकोष्ठता नेमकी कशामुळे आहे हे जाणून घ्यायला हवं.



लॅक्टॉस इन्टॉलरन्सचा त्रास असणाऱ्या अनेकांना पचनाशी संबंधित समस्या जाणवतच नाहीत. त्याऐवजी एक्झिमा, डोकेदुखी, तोंड येणं, थकवा येणं, एकाग्रता कमी होणं, स्नायू, सांधेदुखी, मूत्रमार्गाशी संबंधित समस्या अशी लक्षणं दिसून येतात. अर्थात ही लक्षणं इतर व्याधींमुळेही असू शकतात. लॅक्टॉसचा त्रास असेल तर शरीरात गॅस तयार होतो. लॅक्टॉस आंबण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डाय ऑक्साइड, मिथेन, हायड्रोजन अशा वायूंची निर्मिती होते. हा प्रकार खूपच त्रासदायक असतो.

पोट फुगणं तसंच पोटदुखी ही लॅक्टॉस इन्टॉलरन्सशी संबंधित सर्वसामान्य लक्षणं आहेत. लॅक्टॉस इन्टॉलरन्समुळे मोठ्या आतड्यातलं पाण्याचं प्रमाण वाढतं. यामुळे शौचाही पाण्यासारखं पातळ होतं. जुलाब हे सुद्धा लॅक्टॉसच्या त्रासाचं लक्षण असू शकतं.

नवसंशोधन

### पोटावरची चरबी ठरते घातक!



सुटलेलं पोट खूप धोकादायक असतं. पोटावरच्या चरबीमुळे अनेक व्याधी जडू शकतात. पोटावर साठलेल्या चरबीमुळे हृदयविकारासह पक्षाघात, अस्थमासह इतर काही विकार होऊ शकतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एकदा हृदयविकाराचा झटका आलेल्यांच्या पोटावर चरबी साठली असेल तर त्यांना दुसऱ्यांदा हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. स्वीडनमधल्या कॅरोलिन्स्का संस्थेत याबाबत संशोधन करण्यात आलं. त्यावरून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यामुळे नियमित व्यायाम आणि पोषक आहाराचं सेवन करून वजन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे.

दंतारोग्य

### टूथपेस्ट ठरू शकते घातक...


सकाळी उठल्यावर आपण सर्वात आधी दात घासतो. दात घासल्यानंतर तोंडाचं आरोग्य उत्तम राहील, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात टूथपेस्टमधल्या काही घटकांमुळे त्रास होऊ शकतो. टूथपेस्टमध्ये फ्लोराइडसह इतर काही घातक रसायनं असतात. दात घासताना थोडीफार पेस्ट पोटातही जाते. इतकंच नाही, तर टूथपेस्टमधल्या ग्लिसरिनमुळे दातांवर थर तयार होतो आणि हा थर दातांच्या आरोग्यासाठी मारक ठरू शकतो. यामुळे दात कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे टूथपेस्ट खरेदी करताना त्यातल्या रसायनांची माहिती घ्या.



जपणूक केसांची

### टाळूची योग्य देखभाल

आपण केसांची काळजी घेतो. पण टाळूच्या त्वचेकडे आपलं दुर्लक्ष होतं. केसांचं आरोग्य जपण्यासाठी टाळूकडेही विशेष लक्ष द्यायला हवं. टाळूची स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. केस धुताना टाळूलाही शँपू लावायला हवा. यामुळे टाळूवरची धूळ, घाण निघून जाते. अर्थात टाळू जास्त वेळा धुवू नये. टाळू सतत धुतल्यामुळे ती कोरडी होऊ शकते. नियमितपणे तेल लावायला हवं. तेलामुळे टाळूला ओलावा मिळतो. टाळू निरोगी असेल तर तुमचे केसही छान वाढू लागतील.



आजीबाईचा बटवा

### औषधी डिंक

डिंक खूप औषधी असतो. थंडीत डिंकाचे लाडू खाल्ले जातात. डिंकाच्या लाडूसोबत दूध प्यायल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. थंडीच्या काळातल्या विविध विकारांचा सामना करायला शरीर सक्षम होतं. डिंकामुळे हाडं बळकट होतात, स्नायूंना खाद्य मिळतं. पाठीचा कणा बळकट होण्यासाठी डिंक खायला हवा. भाजलेल्या डिंकाच्या नियमित सेवनामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. अशक्तपणा आला असेल तर डिंक खाता येईल. गर्भवती महिलांनी डिंक खायला हवा. मासिक पाळीबाबतच्या तक्रारी डिंकामुळे दूर होतात.



# राहुल गांधींनी मतचोरी सिद्ध केली.. आ. रोहित पवारांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १३ :



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपची साथ सोडली तर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील, असे महत्वपूर्ण विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बुधवारी येथे बोलताना केले.

रोहित पवार यांनी या विधानाद्वारे एकप्रकारे अजित पवारांना सोबत येण्याचीच ऑफर दिल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाली आहे. त्याचे आमच्याकडे पुरावेही आहेत. हे पुरावे आम्ही लवकरच उघड करू, असा इशाराही त्यांनी यावेळी सत्ताधारी महायुतीला दिला.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची सध्या मंडल यात्रा सुरू आहे. बुधवारी ही यात्रा भंडाऱ्यात पोहोचली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या एकत्रीकरणावर भाष्य केले. आमचा लढा भाजपच्या विरोधात आहे. भाजपच्या विचासरणी विरोधात आहे. त्यामुळे अजित पवार भाजपची साथ सोडून शरद पवार यांच्या पुरोगामी विचारांसोबत आले, तर त्यावेळी आम्ही विचार करू. पण अजित पवार भाजपसोबत असतील तर आम्ही एकत्रित येऊच शकत नाही. त्यांनी भाजपला सोडले, तर सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन आपण काय करायचे यावर विचार केला जाईल. त्यानंतर त्यासंबंधी योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रात शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही मोठी फूट पडली. राष्ट्रवादीचे बहुतांश आमदार हे अजित पवारांसोबत गेले. त्यानंतर अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या रूपाने आपल्या नव्या पक्षाची बांधणी केली. त्यांच्या पक्षाला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाले. पण विधानसभा निवडणुकीत त्यांची मोठी हाराकिरी झाली. त्यानंतर सातत्याने राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली आहे. पण ती केव्हाच पुढे सरकली नाही. पण आता रोहित पवारांनी वरील विधान करत या चर्चेला पुन्हा हवा दिली आहे.

**राहुल गांधींनी मतचोरी सिद्ध केली**

रोहित पवार यांनी यावेळी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतचोरी झाल्याचा आरोप केला. राहुल गांधी यांनी पुराव्यानिशी मतचोरी झाल्याचे उघड केले आहे. आमच्याकडेही त्याचे पुरावे आहेत. हे पुरावे टप्प्याटप्प्याने समोर आणले जातील. मतांची चोरी ही लोकशाहीची चोरी असते. त्यामुळे लोकशाहीची चोरी होत असेल तर गरिबांना न्याय देता येणार नाही. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना अनेक प्रलोभने दाखवली. पण अजून एकही आश्वासन पूर्ण केले नाही.

माझ्यावरही ईडीची कारवाई करण्यात आली. पण मराठी माणूस लढाईसाठी कायम तयार असतो. त्यानुसार मी लढा देत आहे. काहीजण कारवाईच्या धास्तीने सत्तेच्या दिशेने गेले. पण आमच्यासोबत सर्वजण निष्ठावान आहेत. त्यामुळे येत्या काळात आम्हाचा निश्चितच यश मिळेल, असे ते म्हणाले.

**भर पावसात मोर्चा**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी भंडारा जिल्ह्यात आज काढण्यात आलेल्या हक्काच्या मोर्चाला भर पावसातही प्रचंड प्रतिसाद मिळाला. मोर्चात प्रदेशाध्यक्ष व आमदार शशिकांत शिंदे, आमदार रोहितदादा पवार, माजी आमदार सुनील भुसारा, ओबीसी प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, तसेच जिल्हा स्तरावरील सर्व सेल जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारोच्या संख्येने शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक - युवती उपस्थित होते.

मोर्चातून शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी, पिकांच्या नुकसानीची तातडीने भरपाई यांसारख्या मागण्या जोरदारपणे मांडण्यात आल्या.

# वडेट्टीवारांनी स्वीकारले आव्हान

## बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या, दूध का दूध होऊन जाऊ द्या!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेतील विजयाप्रकरणी दिलेले आव्हान स्वीकारले आहे. आम्ही तुमचे चॅलेंज स्वीकारले. दूध का दधू आणि पाणी का पाणी होऊन जाऊ द्या, पण सर्व निवडणुका ह्या बॅलेट पेपरवर घ्या, असे ते म्हणालेत.

बावनकुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांत भाजपने ५१ टक्के मतदानाची तयारी केल्याचा दावा केला होता. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत आम्हाला ५१ टक्के मते मिळाली. राज ठाकरे व त्यांच्या मित्र पक्षांनी काय तयारी केली हे आम्हाला माहिती नाही, पण आमची तयारी पूर्ण झाली आहे.

कुणीही आले आणि लढले तरी ५१ टक्के मते ही महायुतीलाच मिळणार. काँग्रेस, शरद पवार गट किंवा ठाकरे गटाला एकही जागा मिळणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला समृद्ध करत आहेत, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचा विकास साधत आहेत. त्यामुळे जनता विकासाच्याच बाजूने जाणार आहे, असे ते म्हणाले होते.

विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या या दाव्याचा दाखला देत त्यांना बॅलेट पेपरवर ५१ टक्के मतदान घेऊन दाखवण्याचे आव्हान दिले. ते म्हणाले, चोरी तर चोरी वर शिरजोरी असा प्रकार सध्या सुरू आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरी उघड केली. त्यावेळी भाजपने उत्तर देणे सुरू केले. जसे काही हेच निवडणूक आयोगाचे वकील आहेत. आता तर हद्दच झाली. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमचे नाव घेऊन आम्हाला चॅलेंज केले की, नागपूर महापालिका निवडणुकीत आम्ही ५१ टक्के मतदान घेऊ. मी सुद्धा चॅलेंज स्वीकारतो. पण एक लक्षात घ्या. सर्व मतदान बॅलेट पेपरवर घ्या. तुम्ही ५१ टक्के मतदान घेऊन दाखवा हे आमचे आव्हान आहे.

तुमच्यात हिंमत असेल तर संपूर्ण महापालिकेत ५१ टक्के घ्या. पण बॅलेट पेपरवर निवडणूक घ्या आणि होऊन जाऊ द्या दूध का दूध पाणी का पाणी. तुम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटच गायब करायचा निर्णय घेतला.

त्यावरूनच या प्रकरणी तुमची भूमिका ईमानदारीची आहे की मतचोरीची आहे हे स्पष्ट होते. व्हीव्हीपॅट गायब करायचे आणि पुन्हा ५१ टक्के मतदान घेण्याची भाषा करायची हे चुकीचे आहे. भाजपने ५१ टक्के मते घेऊन दाखवावी, पण ती बॅलेट पेपरवर निवडणूक घेऊन दाखवावे. त्यानंतर लोकांना सत्य काय आहे हे कळेल, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**राक्षसी बहुमतामुळे विसर**

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी कल्याणकारी योजना बंद करण्यावरूनही महायुती सरकारवर निशाणा साधला. राक्षसी बहुमतामुळे राज्य सरकारला आता हिंदू जनतेचा विसर. विधानसभा निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करायची दूरच राहिली, आता तर ज्या योजना सुरू होत्या. त्याही बंद करण्याचा पराक्रम राज्य सरकारने केला आहे. हिंदूंच्या सणासुदीला गोरगरिबांना दिला जाणारा आनंदाचा शिधा ही योजना यावेळी राबवणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मुस्लिम बांधवांसाठी ईदला सौगात ए मोदी नावाने किट वाटणारी भाजप आता सत्ता मिळाल्यावर मात्र हिंदूंच्या सणासुदीला हिंदू गोरगरीब जनतेला वाऱ्यावर सोडत आहे. यांना मतांसाठी केवळ हिंदू हवेत असे ते म्हणाले.

# धर्मादाय नावाखाली कोट्यवधींचा घोटाळा

## दानवे यांचा भुजबळांवर प्रहार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :



शालेय मुलांच्या ताटातला तांदूळही गिळंकृत करणारे हात कोणाचे? विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उघड केलेल्या या धमार्दाय घोटाळ्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभाग हादरला आहे. दानवे यांनी थेट मंत्री छगन भुजबळ यांना पत्र लिहून मुंबई जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागाच्या तांदूळ वाहतूक कंत्राटातील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी एसआयटीमार्फत करण्याची मागणी केली आहे.

आरोपांचा केंद्रबिंदू म्हणजे मेसर्स. श्री जे. बी. ग्रेन्स डीलर्स असोसिएशन ही तथाकथित धमार्दाय संस्था. नाव सेवेचं, पण काम मात्र काळ्या बाजाराचं! दानवे यांच्या म्हणण्यानुसार, या ट्रस्टने नियम मोडून व्यावसायिक व्यवहार केले, नफ्याचा मोठा हिस्सा (८०% शेअर्स) थेट अध्यक्ष अनिलकुमार गुप्ता आणि त्यांच्या कुटुंबियांच्या खिशात गेला. एवढंच नाही तर विद्यार्थ्यांसाठीचा अनुदानित तांदूळ परदेशात, तेही आफ्रिकन देशांत तस्करी केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

धक्कादायक म्हणजे, रेल्वे प्रशासनाने सुरक्षा ठेव जप्त करून ज्यांचे कंत्राट रद्द केले, त्याच संस्थेला शासनाच्या डीपीईएमएस विभागाने पुन्हा कंत्राट दिले. कोणत्या दबावाखाली हा निर्णय झाला? असा सरळ सवाल दानवे यांनी भुजबळांना केला आहे.

वाहतूक निविदा न काढता थेट गुप्ता यांच्या मालकीच्या वाहनांना दिली गेली, आणि नफा सरळ त्यांच्या खात्यात जमा झाला. त्यातच, एका विभागात ९५ रुपये प्रति क्विंटल दराने काम करणारी संस्था संपूर्ण मुंबईत १,१४० रुपये प्रति क्विंटल दराने काम कशी करू शकते, हा प्रश्न अधिकच संशयास्पद ठरतो. यामुळे अनुदानित तांदूळ काळ्या बाजारात विकून तस्करी होत असल्याचा संशय बळावला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी दानवे यांनी केली आहे.

# ३० टक्केच वाहनांनाच एचएसआरपी पाट्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

राज्यात २० टक्केच वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (एचएसआरपी) लागली आहे. तर १० टक्के वाहन धारकांनी ही पाटी लावण्यासाठी पैसे भरून वेळ घेतली असून तीही लवकरच लागेल. दरम्यान शिल्लक ७० टक्के वाहनांनी अद्याप पाटी लावण्याकडे पाठ दाखवली असून १५ ऑगस्टला पाटी लावण्याबाबत शेवटची मुदत आहे.




केंद्र सरकारने २०१९ पूर्वीच्या सगळ्याच संवगार्तील वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (एचएसआरपी) लावणे बंधनकारक केले आहे. ही पाटी लावण्याची मोहीम १ जानेवारी २०२५ पासून सुरू झाली आहे. पाटी लावण्याचा नागरिकांचा खूपच संथ प्रतिसाद असल्याने आजपर्यंत पाटी लावण्यासाठी परिवहन खात्याने तीनदा मुदतवाढ दिली आहे. मागच्या महिन्यात मुदतवाढ मिळाल्यावरही पाटी लावण्याला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. राज्यात मागील सात महिन्यांचा कालावधीत १९.५७ टक्के वाहनांना एचएसआरपी बसविण्यात आलेली आहे.

दरम्यान परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी पुण्यात ११ व १२ ऑगस्ट अशी दोन दिवस राज्यभरातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची बैठकही घेतली होती. या बैठकीत फिटमेंट सेंटर वाढविण्याची, एचएसआरपी बसविण्यात वाहनचालकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या आणि जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. परंतु, मुदत वाढीबाबत काहीच बोलले नसल्याची सूत्रांची माहिती आहे.

# १५ ऑगस्टला करावी जन्माष्टमी



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३ :

सर्वसाधारण गृहस्थांना १५ ऑगस्ट रोजी जन्माष्टमी उपवास इत्यादी केले पाहिजे, महाराष्ट्रीयन पंचांग, सम्राट, जय विनोदी, वल्लभ मनीराम, निर्णय सागर इत्यादी सगळ्या पंचांग, निर्णय सिंधू धर्म सिंधू इत्यादी ग्रंथांचा आधार घेऊन उपरोक्त मत अकोला पूर्वी संघ यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी १५ ऑगस्ट आणि १६ ऑगस्ट अशा दोन रोजी जन्माष्टमी येत आहे या संदर्भात अकोला पुरोहित संघ यांची सभा श्री बालाजी मंदिर येथे घेण्यात आली, शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी रात्री ११:४९ पासून अष्टमी तिथी लागत आहे, शनिवार १६ ऑगस्ट या दिवशी अष्टमी तिथी रात्री ९ वाजून ३४ मिनिट पर्यंत राहील.

सर्व शास्त्र अष्टमी तिथी मध्यरात्री निशीथ काल असा जास्त महत्व दर्शवतात याच महत्व घेऊन साधारण ग्रहस्थी यांना १५ ऑगस्ट रोजी जन्माष्टमी व्रत इत्यादी केले पाहिजे, साधू संन्यासी यती योगी महात्मा वैष्णव गुरुद्वारा दीक्षित वैष्णव चिन्ह धारण करणारे अशा वैष्णव लोकांना १६ ऑगस्टशनिवार रोजी जन्माष्टमी करावी असा निर्णय रोहित संघ यांची सभेत घेण्यात आले या सभेत पंडित श्यामसुंदर अवस्थी, राजू सिरोलीया, गजराज मिश्रा, लाला तिवारी, पुजारी दीपक तिवारी एवं पंडित रवी कुमार शर्मा उपस्थित होते. पंडित रतन तिवारी, भैरव शर्मा, प्रमोद तिवारी, सुमित तिवारी यांनी आपली सहमती दर्शविली.

: मुलखावेगळी माणसं :

# सायकलवरून जग जिंकणारी वेदांगी



लोकमानस

जगात अशा अनेक व्यक्ती आहेत कि ज्यांना आपल्या कर्तृत्वाने जग जिंकावे असे वाटते. परंतु हेच जग चक्क सायकलस्वारी करून जिंकावे अशी आगळीवेगळी महत्वाकांक्षा मात्र पुण्यातील वेदांगी नावाच्या मुलीने मनात बाळगली आणि सायकलस्वारीचा छंद जोपासत तिने खरोखरच जगाची सफर सायकल चालवून पूर्ण केली आहे.

चक्क सायकलवरून जगाची भ्रमंती करण्याचा विक्रम जगात केवळ पुण्यातील वेदांगी कुलकर्णीच्याच नावे आहे. वेदांगीने १५९ दिवसात तब्बल २९ हजार किलोमीटर अंतर सायकलवरून पार केले आहे. ऑस्ट्रेलियाच्या पर्थ शहरातून १७ जुलै रोजी जग भ्रमंतीला तिने सुरवात केली. आणि तब्बल १५९ दिवस १४ वेगवेगळ्या देशातून भ्रमन्ती सायकलवरून करत तिने हे यश संपादन केले आहे. अर्थात तिचा हा प्रवास तितका सोपा नक्कीच नव्हता.

जगाच्या या भ्रमंतीत अनेक प्रकारची स्थळ लागणार, अनेक प्रकारची माणस भेटणार, कुठे काय होईल याची शाश्वती नसताना देखील वेदांगीच्या आईवडिलांनी तिला जगाच्या भ्रमंती याकरिता परवानगी दिली. वेदांगी स्पेन मधून सायकल चालवत असताना तिला दोन चोर भेटले. तिच्याकडे पैसे मागण्यासाठी त्या चोरांनी झटापट देखील केली. मात्र त्या चोरांशी दोन हात करत, तिथल्या स्थानिक भाषेवर मात करत पोलिसांच्या मदतीने वेदांगीने आपली सुटका करून घेतली.

वेदांगीने अशा प्रकारचे साहस करायला सुरवात केली तेंव्हा तिला अनेक गोष्टी माहित नव्हत्या. ती इंग्लडला शिकायला गेली तेंव्हा त्यांची भाषा,उच्चार येत नव्हते. त्यांचे वाहतुकीचे नियम देखील माहित नव्हते. ती राईडला जायची तेंव्हा रात्री अनोळखी लोकांचा दरवाजा ठोठावून त्यांच्याकडे राहायची.

कधी चर्चयार्ड मध्ये किंवा अगदी पेट्रोल पंपावर देखील तिने या प्रवासात मुक्काम केला आहे. रस्त्यात जे मिळेल ते ती खायची. तिने हा प्रवास खूप कमी पैशामध्ये केला आहे. तिच्या या राईडला १० प्रयोजकांनी पैसे पुरविले आहेत. त्यामुळे कमीत कमी पैशामध्ये जास्तीत अंतर गाठणे हे तिचे ध्येय होते. जग जाणून घ्यायचे हेच तिचे मुख्य भांडवल होते.

पुण्यातील पिंपरी चिंचवडमध्ये १२ वी पर्यंतचे शिक्षण वेदांगीने घेतले. त्यानंतर युके मध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी वेदांगी गेली. तिथेच तिच्या मनात जग भ्रमंतीचा विचार आला आणि तिने आपल्या जिद्दीच्या, आत्मविश्वासाच्या जोरावर हा प्रयत्न पूर्ण करून जागतिक विक्रम पूर्ण केला. या प्रवासादरम्यान ती मोबाईल च्या मध्यमातून सातत्याने आपल्या आईवडिलांच्या संपर्कात होती. या प्रवासात वेदांगीने ऑस्ट्रेलिया, भारत, न्यूझीलंड, कॅनडा, पोतुर्गाल, स्पेन, जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन, इंग्लंड अशा एकूण १४ देशांची भ्रमंती केली आहे. आशियातील पहिली जगभ्रमंती करणारी वेदांगी जगात चौथी ठरली आहे.

हे यश वेदांगीने या प्रवासात तिला मदत करणाऱ्या तमाम लोकांना समर्पित केले आहे . हा प्रवास करताना प्रत्येक देशाचा व्हिसा मर्यादित असल्याने कमीत कमी वेळेत तिने जास्तीत जास्त अंतर कापण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी फिटनेस, योगासन,व्यायाम करून तिने हे अभूतपूर्व यश प्राप्त केले आहे. वेदांगीच्या या सायकलवरून जगभ्रमंती सारखया धाडसी वृत्तीची, चिकाटीची आणि मेहनतीची नोंद भारतीयच नव्हे तर जगभरच्या माध्यमांनी घेतली. सर्वात महत्वाचं म्हणजे वेदांगीची हि कामगिरी पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या मन कि बात या कार्यक्रमात तिचे मनभरून कौतुक केले. एकूणच, प्रचंड आत्मविश्स्वास,जिद्द आणि त्याला मेहनतीची जोड असली कि वेदांगी सारखी रणरागिणी आपलं कर्तृत्व जगभरात गाजवू शकते हेच सिद्ध होत.

■ ■ ■

# सरनाईकांचा कडक संदेश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :

आपल्या कुटुंबातील कर्ता पुरुष गमावल्यानंतर आर्थिक आणि मानसिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना आधार देणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून मानवतेचीही हाक आहे, असा ठाम संदेश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिला. अनुकंपा तत्त्वावरील नोकरीचे प्रस्ताव टाळाटाळ न करता संवेदनशीलतेने मार्गी लावा, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रताप सरनाईक यांनी ७० उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीपत्रे प्रदान केली. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख यांच्यासह उमेदवारांचे कुटुंबीय उपस्थित होते.

सरनाईक यांनी सांगितले की, २०१६ पासून प्रलंबित असलेले अनेक प्रस्ताव मार्गी लावत आजपर्यंत १३६ जणांना विविध पदांवर नियुक्ती देण्यात आली आहे. यामध्ये वाहतूक निरीक्षक, प्रभारक, लेखाकार, सहाय्यक सुरक्षा निरीक्षक, लिपिक-टंकलेखक अशा पदांचा समावेश आहे. याशिवाय, ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत विभागीय पातळीवर आणखी ६६ उमेदवारांना नियुक्ती देण्याची घोषणा सरनाईक यांनी केली.

## माझं मत

# राज्यातील कबुतरखाण्याच्या वादावर तोडगा काय?

**जयंत माईणकर, पत्रकार**

मागील काही दिवसापासून राज्यात विशेषतः मुबईतील कबुतरखान्याचा वाद जो चिघळला आहे आणि त्याला आता आक्रमक रूप प्राप्त झालेलं आहे हा निव्वळ राजकीय स्टंट बाजीचा प्रकार आहे असं वाटत. मुळात कबुतर खाण्यामुळे या कबुतरांच्या विष्ठेमुळे, उडणाऱ्या पंखांमुळे दमेकरी लोकांची संख्या वाढतेय आणि क्षयरोगासारखा आजार देखील वाढतोय. हेच गंभीर कारण लक्षात घेऊन सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून उच्च न्यायालयाने अशा प्रकारची कबुतर खाणे बंद करावीत आणि या कबुतरांना दाना पाणी घालू अन्य असे आदेश दिलेले असताना देखील काही लोक जैन समाजाला पुढे करून हे प्रकरण वाढवीत आहेत. कबुतर हा पक्षी आहे त्याला इतर पक्षांप्रमाणेच मुक्त फिरू द्यावे.

**सुमित कोठारी, संघटक जैन समाज**

जैन समाजाची पूर्वापार श्रद्धा आहे कि पशु आणि पक्षांना भूतदया दाखवून त्यांना अन्न पाणी द्यावे. त्यामुळेच मागील अनेक वर्षापासून मुंबई सह इतर जिल्ह्यांमध्ये देखील जैन मंदिरांच्या आसपास कबुतर खाणे आहेत आणि गाई देखील पाळण्याची प्रथा आहे. मात्र अनेक वर्षा नंतर आताच अचानक कबुतरामुळे दमा आणि क्षय रोग होतो असा शोध काही लोकांना लागला आणि कोर्टाने देखील त्याला दुजोरा दिला. स्वाभाविक पणे यामुळे जैन समाजाच्या भावना दुखावणारच. माझे म्हणणे असे आहे कि जिथे लोकवस्ती नसेल अशा भागात कबुतर खाणे बनवावेत आणि पर्यायी जागा द्यावी म्हणजे लोकांना आजार होणार नाहीत आणि जैन समाजाच्या श्रद्धांची देखील पायमल्ली होणार नाही.

■ ■ ■

# सुरतनंतर जीपचे गुजरातमध्ये दुसरे स्टेलँटिस ब्रँड हाऊस



भारतात ग्राहकांची सुलभता आणि ब्रँड पोहोच वाढवण्याच्या आपल्या वचनावर पाऊल ठेवत, स्टेलँटिस इंडियाने गुजरातमध्ये दुसरे स्टेलँटिस ब्रँड हाऊस लाँच करून पश्चिम भारतात आपली उपस्थिती आणखी वाढवली आहे, सुरतमध्ये या स्वरूपाच्या यशस्वी पदार्पणानंतर. अहमदाबाद येथील सुविधा जागतिक स्तरावर प्रशंसित जीप आणि सिट्रोएन ब्रँड्सना एकाच छताखाली एकत्र आणते, ज्यामुळे ग्राहकांना एक अखंड भौतिक किरकोळ विक्रीचा अनुभव मिळतो. अहमदाबादमधील स्टेलांटिस ब्रँड हाऊसमध्ये ग्रँड चेरोकी, रँग्लर, मेरिडियन आणि कंपाससह जीप~ एसयूव्हीची संपूर्ण श्रेणी प्रदर्शित केली जाते, तसेच सिट्रोएनच्या बेसाल्ट, ई-सी३, सी३, सी५ एअरक्रॉस आणि सी३ एअरक्रॉस यासारख्या विशिष्ट ऑफरिंग्ज देखील आहेत.

ग्राहक आता एकाच, एकत्रित जागेत दोन्ही ब्रँड एक्सप्लोर करू शकतात, कस्टमाइझ करू शकतात आणि अनुभवू शकतात जे विक्री आणि विक्रीनंतरच्या सेवांमध्ये सुसंगतता सुनिश्चित करते. स्टेलांटिस इंडियाचे ऑटोमोटिव्ह ब्रँड्सचे व्यवसाय प्रमुख कुमार प्रियेश म्हणाले, अहमदाबादचे ऑटोमोटिव्ह लँडस्केप उत्साही आणि वाढत्या प्रमाणात आहे, ज्यामुळे ते आमच्या पुढील स्टेलांटिस ब्रँड हाऊससाठी योग्य स्थान बनले आहे. ही ड्युअल-ब्रँड सुविधा आजच्या ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या पसंतींना पूर्ण करण्यासाठी डिझाइन केली आहे, जी दोन प्रीमियम ब्रँडची सुविधा, एक अखंड भौतिक अनुभव आणि जागतिक दर्जाची सेवा देते. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# बीडीसीसी अध्यक्षपदी सुनील फुंडे बिनविरोध

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १३ :



भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे सुनील फुंडे यांची तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्ष पदी भाजपचे प्रदीप पडोळे यांची पहिल्यांदाच निवड करण्यात आली आहे.

या विजयाचे शिल्पकार राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल पटेल असून त्यांच्या नेतृत्वात आणि काँग्रेस संचालकांचा मिळालेल्या छुप्या पाठिंब्याच्या बळावर महायुती प्रणीत सहकार पॅनलने पुन्हा एकदा बँकेच्या इतिहासात तिसऱ्यांदा झेंडा फडकवला व सत्ता मिळविली.

अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी बुधवारी बँकेच्या सभागृहात निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. बँकेच्या एकूण २१ संचालकांपैकी २१ संचालक उपस्थित होते. यावेळी काँग्रेसच्या चार संचालकांनी अर्ज दाखल न केल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध पार पडली. निवडणूक अधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीचे सुनील फुंडे व भाजपचे प्रदीप पडोळे यांची अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

संचालक पदाच्या निवडणूकीत १७ विरुध्द ४ असा निकाल लागल्यानंतर चित्र स्पष्ट झाले होते. तेव्हाच बँकेत सुनील फुंडे यांची तिसऱ्यांदा अध्यक्षपदावर वर्णी लागणार हे सर्वश्रुत होते. त्यामुळे आज केवळ निवडणुकीची औपचारिकता पार पडली.

यावेळी बँकेच्या सभागृहात नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील फुंडे, उपाध्यक्ष प्रदीप पडोळे यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी गोंदिया जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आ. राजेंद्र जैन, राष्ट्रवादीचे नेते धनंजय दलाल, शिंदेसेनेचे अनिल गायधने, बँकेचे संचालक माजी मंत्री नाना पंचबुध्दे, भाजप नेते बाळा अंजनकर, दुध संघाचे अध्यक्ष विलास काटेखाये, भाजप जिल्हाध्यक्ष गोंडाणे, कैलास नशिने, डॉ. वैरागडे यांच्यासह संचालक उपस्थित होते.

**राज्यातही बँक अग्रेसर राहील - सुनील फुंडे**

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुनील फुंडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. आजवर जिल्हा बँकेने खूप चांगली कामगिरी केली, प्रतिकूल परिस्थितीतून आम्ही बँकेला वर आणले. बँकेच्या प्रगतीसाठी माझ्यासह आजवरच्या संचालक मंडळानेही मेहनत घेतली आहे, यापुढेही आम्ही सर्व पदाधिकारी बँकेला मोठं करण्यावर लक्ष देऊ. ही बँक शेतकऱ्यांची बँक आहे, त्यांचा विश्वास बँकेत जपला जाईल आणि बँक आणखी नवी उंची गाठेल, महाराष्ट्र राज्यातही आपली बँक अग्रेसर होती आणि राहील याची ग्वाही देतो, अशा भावना सुनील फुंडे यांनी व्यक्त केल्या.